विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००६ |
| वर्ष | : | आठवे |
| अंक | : | १ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |


**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**
**"ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**
**गणपत्रिका क्रमांक : ११२**

MAHMAR 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
व्ही. पी. एम्.

# दिशा



वर्ष आठवे / अंक १ / डिसेंबर २००६


## संपादकीय

### *जीओइन्फर्मेटिक्स - अमर्याद क्षेत्र*

प्राचीन काळी पृथ्वीवर असणारी भू रचना आज अस्तित्वात नाही. काळाच्या ओघात भूरचनेमध्ये आमूलाग्र बदल होत जाऊन आजचे पाच खंड तयार झाले. ही जमीन किती खोल आहे ? जमीनीचे घटक किती, स्तर किती, या घटकांचे परस्परसंबंध कोणते आहेत, स्तरांचे स्वरुप कसे आहे इ. असंख्य प्रश्नांचा संशोधन स्तरावरील अभ्यास होत होत भूगर्भशास्त्र प्रगत होत गेले आहे. पृथ्वीवर होणारे भूकंप, ज्वालामुखींचे उद्रेक, विशिष्ट प्रदेशाची विशिष्ट भूशास्त्रीय रचना इत्यादी अनेक संदर्भ या विषयाला आहेत. तसेच पर्वत, खडक, दगड अशा वस्तूंची निर्मिती, त्यांची स्वरूपे हा विषयही अभ्यासविषय म्हणून प्रगत झाला. या सर्व अभ्यासातूनच भूगर्भशास्त्र विकसित झाले. या बरोबरच उपग्रहांच्या माध्यमांतून होणाऱ्या माहिती संप्रेषणामुळे भौगोलिक माहिती पद्धतींचा विकासही मोठ्या प्रमाणात झाला. त्यातूनच दूरस्थ संवेदन शास्त्राची निर्मिती व विकास शक्य झाले. दूरस्थ संवेदन शास्त्रामुळे अनेक घटना, वाहतूक व्यवस्था, रहदारी इत्यादींचे नियंत्रण व अभ्यास होण्यास सुरुवात झालेली दिसते. जीओइन्फर्मेटिक्समध्ये अशा प्रकारे भौगोलिक माहिती पद्धती व दूरस्थ संवेदन शास्त्र यांचे संदर्भही वाढत गेले.

या शास्त्राशी संबंधित असे जीवाश्मांचा अभ्यास करणारे शास्त्र, सागरासंबंधातील विज्ञान खनिजशास्त्र इत्यादी विषयांचा विकास देखील भूगर्भशास्त्राच्या उपयोजनाकरिता झालेला दिसतो.

माहितीशास्त्र आणि माहिती तंत्रज्ञान यांचे उपयोजन आज सर्वच विषयांच्या क्षेत्रात निरनिराळ्या स्वरूपात होताना दिसत आहे. तंत्रज्ञानाचा वापर करुन त्या त्या विषयांतर्गत तयार होणारी माहिती व तिचे प्रमाण इतके जास्त आहे की या माहितीची साठवणूक, हाताळणी, वापर व विनियोग यात मूलभूत स्तरांवर शिस्त निर्माण होण्याची गरज आहे त्यामुळे अनेक विषयांतील माहितीचे साठे निर्माण करणे, त्या साठ्यांचे संपादन, संकलन करणे व पुढील संशोधकांकरिता, अभ्यासकांकरिता आवश्यक असणाऱ्या स्वरुपात सादरीकरण करणे हे मोठे आव्हान ठरु लागले आहे. ज्ञानाधिष्ठित समाजाकडे चालू झालेल्या वाटचालीचे हे निदर्शक आहे. हे काम वरकरणी प्राथमिक व सोपे वाटत असले तरी पद्धती (सिस्टीम्स) निर्माण करणे, जुन्या पद्धतींची माहितीची संगणक तंत्रज्ञानाच्या संदर्भात पुनर्मांडणी करणे हे अतिशय संकुल स्वरुपाचे काम आहे.



व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष आठवे / अंक ७ / डिसेंबर २००६

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष ११ वे / अंक ६ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ ११९१
२५४१ ३५४६
Email perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | आपल्या परिसरातील 'पोखरण'! | श्री. पुनम सिंगवी | ३ |
| २) | क्रिकेटला अवास्तव महत्त्व दिले जात आहे का? | श्री. प्र. द. अरदकर | ५ |
| ३) | योगी श्रीअरविंद (लेखांक दुसरा) | श्री. शं. बा. मठ | ७ |
| ४) | या चित्रांमागे दडलंय् काय ? | सौ. मंजिरी दांडेकर | ११ |
| ५) | डॉ. महेश केळुसकर : वाङ्मय संपदा (भाग २) | डॉ. प्रदीप कर्णिक | १३ |
| ६) | स्थापत्य विशारद - भारतरत्न डॉ. सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या जन्मदिन | सौ. भारती जोशी | २१ |
| ७) | श्री चिअर्स फॉर 'MY' मराठी! | श्री. अनिरुद्ध पागे | २३ |
| ८) | बा.ना बांदोडकर विज्ञान महाविद्यालय ठाणे लिनक्स ठाणे २००६ | | २५ |
| ९) | सुरत शहरातला पूर | श्रीमती अमिषा शहा | २६ |
| १०) | परिसर वार्ता | संकलित | २८ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आपल्या परिसरातील 'पोखरण'!

*डोंगर पोखरत गेल्याने पर्यावरणाची अक्षम्य हानी आपण करतोय. हे थांबून या डोंगराचे व त्यातील पर्यावरणाचे रक्षण करावयास हवे, याबाबत मार्गदर्शक ठरेल असा हा लेख. - संपादक*

शहराच्या चारही बाजूंनी उंच, सुंदर डोंगरांनी नाशिक शहर वेढलेले आहे. यातील एका डोंगरात सुप्रसिद्ध आणि पुरातन अशी पांडवलेणी आहेत. तर, दुसऱ्या एका रांगेत त्र्यंबकेश्वर सारखे तीर्थक्षेत्र असून याच डोंगरांमधून गोदावरी, वैतरणा आदी नद्या उगम पावतात.

मात्र कोणाची तरी नजर लागावी त्याप्रमाणे आज हे सगळेच डोंगर वेडेवाकड्या पद्धतीने कुरतडले जात असून त्यांतील काही तर चक्क नेस्तनाबूत व्हायच्या मार्गावर आहेत. कारण त्यांत जागोजागी डोंगर पोखरीत खडी काढण्याची यंत्रसामुग्री बसवलेली असून ती सातत्याने धडधडत असते. आपल्याला रस्ते रूंदीकरण, गृहबांधणी, कारखाना उभारणी, धरण निर्मिती अशा वेगवेगळ्या कारणांसाठी प्रचंड प्रमाणात खडीची आवश्यकता भासत असते. मात्र त्यासाठी या डोंगरांचा अशा प्रकारे बळी देणे खरेच आणि कितपत आवश्यक असते याचा जाणकारांनी विचार करून समाजाचे प्रबोधन करायला हवे.



पुनम सिंगवी

खरे तर हे काही फक्त नाशिक परिसरातील डोंगर परिसरापुरतेच मर्यादित आहे असे नाही. मुंबई/ठाणे - नाशिक-पुणे-औरंगाबाद या एकूणचं चंदेरी चौकोनात असलेले डोंगर फार मोठ्या प्रमाणात आणि प्रचंड वेगाने पोखरले जाताहेत. त्यामुळे पर्यावरणाची अतोनात हानि होत आहे.

सोबतचे छायाचित्र अनुक्रमे रा. म. क्र. ३ वरील नाशिक, त्याच रस्त्यावरील ठाणे शहराजवळचे माणकोली, ठाणे-घोडबंदर रोडवरील नागला बंदर परिसरातील असून अगदी अलीकडेच घेतलेली आहेत. पुणे-सातारा रस्त्यावरील कात्रज घाट परिसरात देखील हाच प्रकार चालू आहे. या छायाचित्रात दिसत असल्याप्रमाणे आता डोंगराला खिंडार पाडूनच नव्हे, तर त्यांना जमिनदोस्त करीत नेस्तनाबूत करण्याचे प्रकार होताना दिसताहेत. ठाणे-नवी मुंबई-पनवेल या परिसरातील एकेक डोंगरदेखील असेच भुईसपाट होत, त्यांतून बांधकामासाठी नवनवीन भूखंड उपलब्ध करून घेतले जाताहेत. प्रत्यक्ष मुंबई शहरातील पवई तलाव, चांदिवली आणि पुणे शहराबाहेरील कात्रज घाटातील भूगोल बदलत असल्याचे आपल्या लक्षात येते.

हे डोंगर अशा तऱ्हेने पोखरताना आधी त्या परिसरातील वृक्षांचा बळी घेतला जातो. वनस्पतींची होरपळ केली जाते. माती हासळू दिली जाऊन कातळ उघडा पाडला जातो. आणि मग अर्थातच त्या कातळांना हादरवून टाकणारा सुरुंग लावीत, धाडधाड करीत प्रचंड वेगाने काम करणारी यंत्रसामुग्री लावून त्या डोंगरांचा

कोथळा बाहेर काढून खडीच्या स्वरुपात त्याचा खिमा केला जातो! आपल्याला रूंद रस्ते रेल्वेमार्ग, सुंदर पक्क्या इमारती, रोजगार निर्माण करणारे उद्योगधंदे पाहिजेत, तर हे सारे करायलाच नको का?

पण हे सारे आताच का एकदम लक्षात यायला लागले आहे? त्यांचे प्रमाण आणि वेग वाढला आहे कां? आमची 'विकास कार्य' करीत राहण्याची गती वाढली आहे का? की आधी जमीनीलगतचे आणि भूपृष्ठाखालील कातळ फोडले जात आणि आताच डोंगर पोखरून खडी काढली जात आहे? की आधी दूर, शहराबारेच्या डोंगर परिसरात ते काम चालायचे आणि आमच्या कधीच ते लक्षात येत नसे आणि आता आमचे शहरीकरण या डोंगरांपर्यंत पसरावला लागल्यामुळे ते आम्हाला जाणवायला लागले? यामुळे आमच्या पर्यावरणाचे नक्की काय आणि किती नुकसान होत आहे? ते टाळता येण्यासारखे आहे काय? त्याला काही पर्याय आहेत काय किंबहुना यामुळे होणारे पर्यावरणाचे नुकसान कमीत कमी ठेवण्याच्या दृष्टीने अथवा ते भरून काढण्यासाठी काही उपाययोजना करता येण्यासारख्या आहेत काय?

स्वातंत्र्यानंतरच्या गेल्या अर्धशतकात याचा कोणी विचारच केलेला दिसत नाही. आजच्या कर्त्या पिढीला देखील डोंगर अशा पद्धतीने नष्ट केल्यामुळे होणाऱ्या हानीचे गांभीर्य अजून फारसे लक्षात आले आहे असे दिसत नाही.

मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या एका नव्या आदेशामुळे इ. बारावी पर्यंतच्या शैक्षणिक अभ्यासक्रमात "पर्यावरण शिक्षण" या विषयाचा एक अनिवार्य विषय म्हणून समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे नव्या पिढीला या सर्व प्रश्नांचा अभ्यास करण्याची संधी अनायसेच उपलब्ध होणार आहे. या विद्यार्थ्यांनी पर्यावरण या विषयाचा अभ्यास नुसताच वर्गाच बसून न करता त्यासाठी आपल्या परिसरात भरपूर भ्रमंती करीत राहून आपल्यातील कुतूहल आणि निरीक्षण शक्तीचा पुरेपूर वापर करणे त्यांच्या हिताचे ठरणार आहे. शिक्षक आणि पालकांनी देखील त्यांना तशी संधी उपलब्ध करून देणे आवश्यक ठरणार आहे.

या निमित्ताने माझ्या मनात अजूनही काही प्रश्न निर्माण होत असतात. कोणी जाणकार त्याची उत्तरे देऊ शकला तर ते मार्गदर्शन समाज प्रबोधनाच्या दिशेने नक्कीच उपयुक्त ठरेल.

पूर्वीच्या काळी गृहसंकुले, देवळे, राजवाडे, इ. सर्वांच्या निर्मितीसाठी पाषाणाचाच उपयोग अधिक केला जायचा. त्यासाठी लागणारे हे पाषाण आणि शीळा परिसराची हानी होऊ न देता कुठल्या पद्धतीने उपलब्ध केले जात ?

दुसऱ्या बाजूला याच काळात अनेक डोंगररांगामधून अजिंठा-वेरूळ आदिसारख्या छोट्या-मोठ्या लेण्या अनेक ठिकाणी कोरल्या गेल्या. त्यांतून निघालेला पाषाण नक्कीच अशाच कामांसाठी वापरला गेला असणार. मग हे जे डोंगर पोखरले गेले ते लेण्या कोरण्यासाठी की इतर बांधकामासाठी लागणाऱ्या पाषाणाची गरज भागविण्यासाठी ? कोरण्यात आलेल्या डोंगरांमध्ये अशा तऱ्हेची सुंदर शिल्पे निर्माण करण्यात आली?

तसेच जर असले, तर आजही आम्ही डोंगर पोखरून खडी मिळविण्यापेक्षा ते कोरीत राहून एकीकडे खडीची गरज भागवीत असतांनाच आमच्या सौंदर्य दृष्टीचा अविष्कार दाखवीत पर्यावरणाचे रक्षण नाही का करू शकणार?

**पुनम सिंगवी**
५/००२, फ्लॉवर व्हॅली,
ठाणे ४०० ६०१
दूरध्वनी क्र. २५४० ८६८१

# क्रिकेटला अवास्तव महत्त्व दिले जात आहे का?

*क्रिकेट बरोबर अन्य खेळांचा विकास जसा व्हावयास हवा तसा होत नाही त्यामुळे क्रीडा महासत्तेत, भारत देश म्हणून आपण मागे राहू. या संदर्भातील हे विचार . - संपादक*

एखाद्या शाळकरी मुलाला आपण जर प्रश्न विचारला, की 'आपल्या देशाचा राष्ट्रीय खेळ कोणता'? तर तो आपल्याकडे काहीशा अचंब्याने पाहील आणि एवढी साधी गोष्ट देखील माहिती नाही अशा अविर्भावाने पटदिशी उत्तर देईल 'क्रिकेट'. वास्तविक आपल्या देशाचा राष्ट्रीय खेळ 'हॉकी' हा आहे. मुलांना आपल्या देशाचा राष्ट्रीय खेळ क्रिकेट वाटतो त्यात त्यांचा काहीच दोष नाही. कारण सध्याचे वातावरणच इतके क्रिकेटमय आहे, की त्याला तसे वाटणे साहाजिक आहे. क्रिकेटला आपल्या देशामध्ये एवढी वारेमाप प्रसिद्धी दिली जाते की, असे वाटते की क्रिकेट व्यतिरिक्त दुसरे खेळच नाहीत. क्रिकेटला एवढी प्रसिद्धी आणि वलय लाभलेले आहे की मुलांना साहाजिकच ह्या खेळाचे आकर्षण वाटते आणि प्रत्येकाला आपण 'सचिन तेंडुलकर' व्हावे असे वाटणे तर साहाजिक आहे.

मुलांना क्रिकेट व्यतिरिक्त हॉकी, फुटबॉल, टेनिस, बास्केट बॉल, व्हॉली बॉल, बेसबॉल इ. खेळ असतात हे माहीतच नसते. मग कबड्डी, लंगडी, आट्यापाट्या, खो-खो इ. देशी खेळांची बातच नको. अॅथलेटिक्स, जिम्नॅस्टिक्स, बुद्धिबळ, कुस्ती व इतर खेळांचे त्याला मुळीच आकर्षण वाटत नाही. कारण ह्या खेळांना प्रसिद्धीचे वलय नाही. हे खेळ खेळून भरपूर पैसा मिळेल असे त्यांना वाटत नाही. कारण प्रसिद्धी माध्यमाद्वारे हीच गोष्ट सारखी ठासून सांगितली जाते, त्यांच्या मनावर बिंबविली जाते. वर्तमान पत्रांतून क्रीडाविषयक बातम्या छापल्या जातात, त्यामध्ये ठळक स्थान क्रिकेटलाच दिले जाते. इतर खेळांच्या बातम्या कुठेतरी कोपऱ्यात असतात. दूरदर्शनवर विविध जाहिराती मधून सचिन तेंडुलकर, गांगुली, द्रविड इ. क्रिकेट खेळाडू झळकत असतात. त्यामध्ये हॉकीपटू 'धनराज पिल्ले' किंवा बुद्धिबळपटू 'विश्वनाथन आनंद' क्वचितच दिसतो. त्यामुळे मुलांचे भावविश्व क्रिकेटने भारलेले आहे. आपल्याकडे मुंबईसारख्या शहरात मिळेल तिथे, गल्लीबोळात, रस्त्यावर, इमारतींच्या गच्चीवर कुठेही क्रिकेट हाच खेळ खेळला जातो. क्रिकेटचा वर्ल्डकप किंवा एखादी मालिका चालू असेल तर बघावलाच नको. सर्वांच्या उत्साहाला उधाण येते. जणू काही मुलांच्या अंगी क्रिकेटपटू संचारतात आणि मग स्वत:ला सचिन किंवा सेहवाग समजून अथवा कुंबळे किंवा हरभजन समजून त्यांच्या खेळण्याला ऊत येतो.

क्रिकेट खेळणे वाईट आहे असे मला म्हणावयाचे नाही. क्रिकेटमध्ये भारताने १९८३ चा वर्ल्डकप मिळविलेला आहे. आणि इतर खेळांच्या मानाने बरेच यश संपादन केलेले आहे. ह्याबद्दल कुणाचे दुमत होण्याचे कारण नाही, पण हे एकांगी आहे. क्रिकेट हा काही एकमेव खेळ नाही. क्रिकेटचा अतिरेक होत आहे किंवा त्याला अवास्तव महत्त्व दिले जात आहे. वास्तविक क्रिकेट हा खेळ भारत, पाकिस्तान, श्रीलंका, इंग्लंड, वेस्टइंडीज, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड इ. मोजकेच देश खेळतात तसे इतर खेळांचे नाही. हॉकी, फुटबॉल, टेनिस, बॅडमिंटन, टेबल टेनिस इ. खेळ जगभरातील सगळ्या देशांमधून खेळले जातात. ह्या खेळांमध्ये आपले स्थान काय आहे? पूर्वी हॉकीमध्ये आपले निर्विवाद वर्चस्व होते.

मॉस्को ऑलिंपिक पर्यंत हॉकीचे सुवर्णपदक अधून मधून का होईना बऱ्याच वेळा आपण मिळविलेले आहे. मेजर ध्यानसिंगना तर 'हॉकीचे जादूगार' समजले जाई. आता हॉकीचे चित्र पालटले आहे. फुटबॉलमध्ये तर आपण ऑलिंपिकसाठी पात्रसुद्धा ठरत नाही. ह्याचे कारण काय?

इतर खेळांबद्दल शाळा कॉलेजांपासून राजकरणी मंडळीपर्यंत असणारी अनास्था आणि क्रिकेटबद्दलचे अवाजवी आकर्षण आणि त्याला दिले जाणारे अवास्तव महत्त्व असे मला वाटते.

हॉकीचे सुवर्णपदक सोडले तर आपल्या देशाने आजवर ऑलिंपिक खेळाच्या इतिहासामध्ये कितीशी वैयक्तिक पदके मिळविलेली आहेत? १९५२ मध्ये हेलसिंकी ऑलिंपिक मध्ये खाशाबा जाधव ह्यांनी मिळविलेले कुस्तीतील कांस्यपदक, त्यानंतर हल्ली लिअँडरपेसने मिळविलेले टेनिसमधील, किंवा कर्नाम मल्लेश्वरी हिने मिळविलेले वेटलिफ्टिंगमधील, राजवर्धन राठोर ह्याने नेमबाजीमध्ये मिळविलेले रौप्य पदक इ. एका हाताच्या बोटावर मोजता येईल इतकी पदके आपल्या देशाने वैयक्तिक खेळांमध्ये मिळविलेली आहेत. उलट चीन, जपान, कोरिया इ. आशियाई देश आणि जर्मनी, रशिया, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, इ. देश पदकांची लयलूट करीत असतात. असे विरोधाभासात्मक चित्र का दिसते? भारतासारख्या खंडप्राय देशामध्ये खेळाडू का निर्माण होऊ नयेत ? त्याला कारण शालेय जीवनापासून खेळाकडे होणारे दुर्लक्ष आणि नियोजनबद्धरीत्या केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचा अभाव हेच आहे. एकेकाळी दक्षिण कोरियामध्ये हॉकी हा खेळ फारसा खेळला जात नसे. पण सोल ऑलिंपिकमध्ये भाग घ्यावयाचा असे त्या देशाने ठरविले आणि मग युद्ध पातळीवर त्यांनी प्रयत्न सुरू केले आणि आज त्यांची हॉकीतील प्रगती लक्षणीय आहे, कौतुकास्पद आहे. असे आपल्या देशात का घडत नाही?

ह्याचे कारण क्रिकेट हा एकमेव खेळ आहे अशी मुलांची समजूत झालेली आहे आणि करिअर करायचे असेल तर ते आपण फक्त क्रिकेट खेळण्यानेच मिळू शकेल अशी त्यांची धारणा आहे. ह्याला इथले क्रिकेटला पोषक, परंतु इतर खेळांना मारक वातावरणच जबाबदार आहे. त्यामुळे इतर खेळ किंवा ॲथलेटिक्स, जिम्नॅस्टिक्स ह्याकडे आपली मुले वळत नाहीत. जिम्नॅस्टिक्स मध्ये नादिया कोमान्सी सारखी खेळाडू १० पैकी १० गुण मिळवीत असताना आपले जिम्नॅस्ट ८ गुणांच्या पलिकडे जाऊ शकत नाहीत. हे कशाचे निदर्शक आहे ? बिलियर्डस् आणि स्नूकर मधील जगज्जेता गीत सेठी, पूर्वीच्या काळातील जगज्जेता मायकेल परेरा, वायुपुत्र मिल्खासिंग ही नावे तरी मुलांना ठाऊक आहेत का अशी शंका मनामध्ये येते. टेनिस मधील विजय आणि आनंद अमृतराज बंधू, बॅडमिंटनमधील प्रकाश पदुकोण, बुद्धिबळपटू मॅन्युएल ॲरॉन, धनुर्विद्येतील लिंबाराम, पी.टी. उषा ह्यांचे ही तेच आहे.

हे चित्र कधी पालटेल? त्यासाठी पद्धतशीर प्रयत्न करावे लागतील. अभ्यासाबरोबरच शालेय जीवनामध्ये खेळालाही अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळे अभ्यासक्रमामध्ये खेळाला योग्य स्थान दिले पाहिजे. १०वी/१२वी ला मेरिटमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले जाते, भरभरून पारितोषिके दिली जातात. त्या प्रमाणे खेळामध्ये प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे दिली गेली पाहिजेत रशियाच्या धर्तीवर 'जिम्नॅशियम्स्' सुरु केली पाहिजेत, ज्यामध्ये विद्यार्थ्यांना खेळामध्येच करिअर करावयाची इच्छा आहे, त्यांना शिकता येईल आणि त्यांच्या आवडीच्या खेळामध्ये प्राविण्य संपादन करता येईल. शासनाने देखील खेळावर केलेला खर्च फुकट जातो असे न मानता, अशा शिक्षण संस्थाना भरघोस अर्थसाहाय्य केले पाहिजे. खेळामध्ये राजकारण तर मुळीच आणता कामा नये. खेळाडू निवडताना Quota System पूर्णपणे बंद करून खेळातील कौशल्याच्या निकषावर त्यांची निवड व्हायला पाहिजे तरच आपल्या राष्ट्रीय क्रीडा बालकाच्या अंगाला आलेली क्रिकेटची सुज कमी होऊन ते खऱ्या अर्थाने गुटगुटीत, सुदृढ आणि बाळसेदार होईल. आणि आपले राष्ट्रपती माननीय ए. पी. जे अब्दुल कलाम ह्यांच्या २०२० पर्यंत भारत देश 'क्रीडा महासत्ता' होईल असे स्वप्न पाहण्या इतपत आशावादी असायला आपल्याला काहीच हरकत नाही, असे मला वाटते.

**श्री. प्र. द. अरदकर**
सहशिक्षक, श्रीरंग विद्यालय, ठाणे.

# योगी श्रीअरविंद
# (लेखांक दुसरा)

*योगी अरविंद यांच्या चरित्राचा पुढील भाग येथे देत आहोत - संपादक*

## बडोदा मुक्काम

श्री अरविंद ८ फेब्रुवारी १८९३ ला बडोदे संस्थानाच्या नोकरीत रुजू झाले व ते १८ जून १९०७ पर्यंत नोकरीत राहिले. १२ जून १९०६ ते १२ जुलै १९०७ पर्यंत सुट्टी वर राहून त्यांनी कार्यात लक्ष घातले. प्रारंभी ते भूनिर्धारण (सर्वे) विभागात काम करत. पुढे त्यांची नेमणूक मुद्रा व राजस्व विभागात करण्यात आली. संस्थानाच्या सचिवालयातही त्यांनी काही दिवस काम केले. बडोद्याचे नरेश वैयक्तिक कामासाठी त्यांची मदत घेत. महत्वाच्या पत्रांच्या कच्चा प्रती तयार करणे, पत्रव्यवहाराच्या कागदपत्रांचा सारांश काढणे इत्यादी कामे करत. एकदा नरेशांबरोबर त्यांना काश्मीरला जावे लागले होते. मात्र ते त्यांचे वैयक्तिक कार्यवाह असे कधीच नव्हते. एकदा बापट प्रकरणाबाबत त्याना उटीस जावे लागले.

इ. स. १९०० मध्ये बडोदा महाविद्यालयाच्या प्राध्यापक पदी त्यांची नेमणूक झाली. इ.स. १९०१ साली भूपालचंद्र बसू यांची कन्या मृणालिनीशी त्यांचा विवाह झाला इ.स. १९०३ मध्ये त्यांनी एक महिन्याची सुटी घेतली, त्यापूर्वी जादा तास घेऊन विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पुरा केला. फ्रेंच भाषेचे जादा वर्ग घेतले. इ.स. १९०४ मध्ये ते उपप्राचार्य झाले. श्री अरविंद टिप्पणी वापरत नसत. विद्यार्थ्यांना त्या बद्दल विशेष आस्था वाटत असे. श्री. कन्हयालाल मुनशी लिहितात - १९०२ साली मी बडोदा विद्यालयात होतो. श्री अरविंदांचे व्याख्यान लक्षपूर्वक ऐकत असे. त्यांचा प्रत्येक शब्द मी मनात घोळवीत असे.

## श्री अरविंद यांचा अभ्यास

श्री अरविंदानी संस्कृत, मराठी, गुजराती व बंगाली या भाषांच्या अध्ययनात अधिक लक्ष घातले. मधुसूदन बंकिमचंद्र यांची काव्ये मूळ बंगालीतच समजावून घेऊन मग रसास्वाद करीत. उपनिषदे, गीता, रामायण, महाभारत, कालिदास भवभूती इत्यादी कवींचे ग्रंथ ही त्यांनी अभ्यासले, त्यामुळे भारतीय जीवन पद्धती विषयी त्यांना जिव्हाळा निर्माण झाला.

श्री अरविंद आपल्या नातेवाईकांकडे, वैद्यनाथ इथे काही काळ घालवीत. त्या प्रवासातही त्यांच्या बरोबर पुस्तकाची पेटी असे. त्यात ते दंग होऊन जात असत. रॉकेलच्या दिव्या जवळ बसून रात्री उशीरापर्यंत ते वाचीत असत. त्यांचे लक्ष इकडे तिकडे जात नसे. सकाळची न्याहरी होताच ते वाचनात वा लेखनात मग्न होत असत. त्यांची राहणी अत्यंत साधी असे. गादी नसलेल्या नुसत्या पलंगावर देखील ते झोपत. वाचन हे त्यांचे प्रमुख व सर्वस्व असे. होमर दान्ते आणि होरेस यांची काव्ये ते एखाद्या भुकेल्या सारखी वाचत.

श्री अरविंदांच्या कवितांचा एक संग्रह 'मार्टिलीप्रत गीते व अन्य कविता' या नावाने १८९५ मध्ये प्रसिद्ध झाला होता. त्यावर युरोपिअन संस्कृतीची छाप दिसते. त्यांनी उर्वशी, प्रेम आणि मृत्यु ही काहीशी प्रदीर्घ काव्ये बडोद्यात रचली आहेत. 'सावित्री' या श्रेष्ठ महाकाव्याची पहिली संकल्पना देखील याच काळातली असावी.

१८९९ साली हितेंद्रकुमार रॉय, बंगाली साहित्यिक यांनी श्रीअरविंदाना बंगाली भाषेतील नैपुण्य मिळविण्यात साहाय्य केले. जवळ जवळ दोन वर्षे ते एकत्र होते. श्रीअरविंदाशी त्यांचा परिचय वाढला तसा त्यांचे अतरंग असामान्य असल्याचे त्यांच्या अनुभवाला आले.

**उपक्रम**

स्वराज्य हा शब्द श्री अरविंद वापरीत पण त्या शब्दाला आध्यात्मिक डूब असे. आध्यात्मिक व राजकीय या दोनही अर्थांनी श्री अरविंदानी स्वराज्याचा पुरस्कार केला. 'वंदेमातरम्' पत्रिकेत (२ मार्च १९०८ साली) त्यांनी लिहिले, ''भारत हा सर्व राष्ट्रांचा गुरू असून, मानवी आत्म्याच्या गहनतर व्यथांची चिकित्सा करणारा तो धन्वन्तरी आहे. जागतिक जीवनाला नवा आकार देण्याचे आणि मानवी आत्म्याला शांतीची फिरून जोड करून, देण्याचे कार्य पुन: एकदा विधात्याने भारताकडे सोपविले आहे. परंतु स्वराज्य मिळविणे ही या कार्याची एक अत्यावश्यक निकड असून भारताने ती पूर्ण करावयालाच हवी.''

**चळवळीच्या तीन बाजू**

१) सशस्त्र बंडाची सिद्धता करण्याच्या प्रमुख हेतूने क्रांतीचा प्रचार व संघटना करणे, हे कार्य त्यांनी प्रथम हाती घेतले.

२) समग्र राष्ट्राला स्वातंत्र्य ध्येयान्मुख करण्याच्या उद्देशाने सार्वजनिक प्रचार करणे. त्यांनी राजकरणात पदार्पण केले त्यावेळी बहुसंख्य भारतीयाना हे ध्येय अव्यवहार्य व अशक्य तसेच स्वप्नरंजन वाटत असे. ते म्हणत-ब्रिटीश साम्राज्य बलाढ्य आहे. संपूर्णपणे नि:शस्त्र आणि नि:सत्व बनवून टाकलेला भारत त्या मानाने दुर्बल आहे. अशा प्रकारच्या खटाटोपात त्याला यश लाभणे स्वप्नात देखील शक्य नाही.

३) वाढता असहकार आणि नि:शस्त्र प्रतिकार या मार्गांनी विदेशी शासन उखडून टाकता यावे म्हणून एकजुटीने आणि उघडपणे विरोध चालू ठेवण्यासाठी जनतेची संघटना उभारणे.

श्री अरविंद पाँडीचेरीस गेल्यानंतर देखील त्यांनी आखून दिलेल्या चाकोरीतूनच भारतीय स्वराज्याचे आंदोलन अगदी स्वातंत्र्य प्राप्त होई पर्यंत प्रगत होत गेले.

श्री अरविंदानी पहिले प्रकट निवेदन 'जुने दिवे देऊन नवे' या नावाने मुंबईच्या 'इंदुप्रकाश' साप्ताहिकात एक लेखमाला लिहिली. ऑगस्ट १८९३ साली इंदुप्रकाशच्या संपादकांनी श्री अरविंद यांचा परिचय करून देताना लिहिले होते, ''आजच्या काळाचे निरीक्षण अत्यंत समर्पकपणे आणि विचारक्षमतेने करणाऱ्या एका लेखकाची सध्याच्या राजकीय प्रगतीवरील लेखमाला प्रसिद्ध करण्याचे दिलेले अभिवचन, त्या लेखमालेच्या पहिला लेख वाचकाच्या हाती देताना आम्हाला आनंद होतो.'' या लेखमालेने देशाला प्रक्षुब्ध केले, हेलावून टाकले, फेब्रुवारी १८९४ पर्यंत ती लेखमाला प्रसिद्ध होत राहिली.

त्यात म्हटले होते कांग्रेसची ध्येये चुकीची असून तिची वाटचाल कळकळीची वा हार्दिक नाही. सुयोग्य नाहीत. पुढारी विश्वासार्ह नाहीत. ही 'अंधेनैव नीयमाना' अशी गोष्ट आहे. चिंतन किंवा सहज प्रवृत्ती यांच्या साहायाने स्वत:च्या अवस्थेचे सुस्पष्ट ज्ञान प्राप्त करणे आणि त्याचा कौशल्याने अधिकात अधिक लाभ करून घेणे यातच राजकारणाचे समग्र रहस्य सामावले असून, आपण नेमके हेच करत नाही आहोत. निष्ठा म्हणजे शक्ती आणि त्याचीच आपल्यात वाण आहे.

श्री अरविंदाची ही जहाल टीका राजकीय वर्तुळात खळबळ माजविणारी ठरली. न्या. महादेव गोविंद रानडे यांनी संपादक श्री. अरविंदांना सौम्य लिहावयास सांगितले. त्यामुळे त्यांचा सारा उत्साहच हरपला. ते राजकीय तत्त्वज्ञानावर लेख लिहू लागले. त्याचाही त्यांना वीट आला.

श्रीअरविंदानी देशाच्या परिस्थितीचा सूक्ष्म अभ्यास केला. व इ.स. १८९८-९९ मधे पहिले पाऊल उचलले. जतिन्द्रनाथ या बंगाली युवकाला बडोदा सेनेत भरती करुन घेतले. पुढे हा निरालंब स्वामी म्हणून प्रसिद्धीस आला. भारताच्या दास्य विमोचनाचे कार्य करावयाचे ठरवून जतीन्द्र बंगालला गेला. युवकांची संघटना, त्यांना क्रांतिकारक कार्याकडे वळविणे, सैनिकी चढाईला उपयुक्त करणे, या कार्यक्रमाचा अंगीकार केला. श्री अरविंद गुप्तपणे ही कार्ये करणाऱ्या संघटनाना भेटी देत व उत्तेजना देत. १९०१ मधे बारीन बडोद्याला आला. त्यालाही क्रांतिकारक कार्यक्रमात सहभागी करुन घेतले. बारीन ह्याने शपथ घेतली. माझ्या जीवात जीव असेतो आणि भारत परदास्यातून मुक्त होईतो मी क्रांतिकार्य चालूच ठेवीन. कोणत्याही प्रकारे मंडळावर आपत्ती ओढवू देणार नाही. अशा प्रसंगी मी प्राणार्पण करीन.

श्रीअरविंदांच्या मते स्वातंत्र्य चळवळ हा राजकीय खेळ नसून ते भूतलावर परमेश्वराची स्थापना करण्याच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल होय. बडोद्याला राहून भारतभर हे कार्य ते पसरवीत होते.

श्री. पी. मित्र आणि क्रांतिवादि गटाच्या इतर नेतृवर्गाना आपले गुप्त मंडळ आणि त्यांची उद्दिष्टे सांगण्यासाठी श्री अरविंद १९०२ साली बंगालमध्ये गेले आणि सर्वांनी या मंडळाची शपथ घेतली. याच वर्षी श्री अरविंद काँग्रेसच्या अधिवेशनासाठी अहमदाबादला गेले. श्री. टिळकही या अधिवेशनाला आले होते. ते श्री अरविंदाशी अधिवेशनाच्या बाहेर एकांतात तासभर बोलले. समाज सुधारणेच्या चळवळी विषयी मतभेद व्यक्त करुन महाराष्ट्रातल्या चळवळीसाठी स्वत: अवलंबिलेल्या मार्गाचे श्री. टिळकांनी स्पष्टीकरण केले.

१९०३ साली श्री अरविंदानी 'तडजोड नाही' या नावाची एक पुस्तिका लिहिली आणि अविनाश नावाच्या क्रांतिवादी गटाच्या एक सदस्याने ती गुप्तपणे छापून काढली.

१९०४ मधे मुंबईत सर हेन्री कॉटन यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या काँग्रेस अधिवेशनाला श्री अरविंद उपस्थित होते. सर हेन्री यानी भारतीय संयुक्त संस्थानाच्या कल्पनेला पाठिंबा दिला पण तो ब्रिटिश साम्राज्याची वसाहत या नात्याने. श्री अरविंदांनी सुसंगतपणे संपूर्ण स्वातंत्र्याचीच भूमिका घेतली होती. याच वर्षी चारुचंद्र दत्त (आय्.सी.एस्) यांची भेट घेऊन श्री अरविंदांनी स्वत: लिहलेले भवानी मंदिर उद्देश पत्रक त्यांना समजावून दिले. त्याला राष्ट्रीय चळवळीचे पत्रक म्हणता येईल. आणखी एक जी. डी. मांडगांवकर (आय्.सी.एस्) श्री. अरविंद यांच्या मतांचे हिरीरीने पुरस्कार करणारे होते.

आपणाला भरुन काढावयाची सामर्थ्याची उणीव, शारीरिक, मानसिक, नैतिक व सर्वात श्रेष्ठ अध्यात्मिक सामर्थ्य असेल तर उरलेले लीलया आपणाला मिळून जातील. सामर्थ्याविना हातपाय कार्य करू शकत नाहीत. करावयाचे कार्य व पाळावयाचे नियम यांचा सविस्तर निर्देश श्री अरविंदांनी भवानी मंदिर उद्देश पत्रकाचा परिशिष्ठत केला होता.

नामदार गोपाळकृष्ण गोखले यांचा अध्यक्षतेखाली १९०५ मधे वाराणसीत भरलेल्या काँग्रेस अधिवेशनाला देखील श्रीअरविंद गेले होते. राष्ट्रीय चळवळीचे नेते त्यांच्याशी कार्यक्रमासंबंधी चर्चा करीत व तदनुसार कार्य करीत. सर्व देशवासियांच्या निषेधाला न जुमानता १६-१०-१९०५ ला बंगालची फाळणी झाली. तिच्या विरुद्ध प्रक्षोभ उसळला. 'वंदे मातरम्' च्या गर्जना आकाशभेदू लागल्या. शासनाने त्याच्यावर बंदी घातली. तिचा परिणाम मात्र नेमका उलटा झाला. आणि 'वंदे मातरम्' हा देशाचा मंत्रच होऊन बसला.

बंकिमचंद्रानी १८८२ साली प्रसिद्ध केलेल्या 'आनंदमठ' या कादंबरीत हे गीत लिहिले होते. 'वंदेमातरम्' हे या गीताचे पालुपद आहे. हे स्फूर्तिदायक गीत या

कादंबरीतील बंडखोर संन्यासी गात. आता हे गीत भारताचे राष्ट्रगीत बनले आहे.

**बंगाल मधील कार्य**

१९०५ मध्ये बंगालची फाळणी झाली. श्री अरविंद आता राष्ट्रीय स्वातंत्र्य संग्रामात उघडपणे सक्रिय भाग घेऊ लागले. १४ एप्रिल १९०६ त ते बारिसाल परिषदेला उपस्थित होते. शासनाने ही परिषद अवैध असल्याची घोषणा केली. त्या घोषणेच्या निषेधार्थ काढलेल्या मिरवणुकीत श्री अरविंद, बिपीन पाल, बंकिमचंद्र चॅटर्जी अग्रभागी होते. मिरवणुकीवर लाठीमार झाला. काही लोक घायाळ झाले. काही दिवसांनी ह्या मंडळींनी निरीक्षण परीक्षणार्थ प्रचंड सभा घेतल्या.

१९०६ मार्चमधे बारीनच्या सूचनेवरुन युगांतर नावांचे एक बंगाली साप्ताहिक काढण्यात आले. त्यातील सुरुवातीचे लेख श्री अरविंद यांनी स्वत:च लिहिले. युगांतर उघडपणे बंडाचा पुरस्कार करी. त्याच्या उपसंपादकावर (विवेकानंद यांच्या बंधूंवर) खटला भरण्यात आला. पण आपण ब्रिटिश शासन मानीत नाही असे कारण सांगून स्वत:चे बचाव करण्याचेही नाकारले. स्वराज्य पदरात पडेतो, राष्ट्रवादी कार्यक्रमाचा शुभारंभ याच कालखंडात प्रथम करण्यात आला. संपूर्ण स्वराज्य म्हणजेच पूर्ण व मर्यादारहित स्वराज हेच भारतातील राजकीय चळवळीचे उद्दिष्ट घोषित करणारे श्रीअरविंद हेच पहिले राजकारणी पुरुष होत. स्वदेशी वस्तूंचा उपयोग, विदेशी वस्तूंवर बहिष्कार, नि:शस्त्र प्रतिकार, असहकार, राष्ट्रीय शिक्षण, वैध संघर्षांचा सार्वजनिक पंचाद्वारा 'निवाडा' इत्यादी अंगांचा प्रभावी प्रचार करणारे अनेक लेख त्यांनी लिहिले.

१९०६ ऑगस्टला कलकत्त्याच्या राष्ट्रीय महाविद्यालयाचे (आजचे जाधवपूर) पहिले प्राचार्यपद श्री अरविंदांनी मासिक केवळ रु. १५०/- नाममात्र वेतनावर स्वीकारले. हे महाविद्यालय जातीय शिक्षा परिषदेच्या विद्यमाने स्थापन झाले होते. त्याच सुमारास (६ ऑगस्ट १९०६) बिपिन पाल यांनी 'वंदे मातरम्' वृत्तपत्र काढले. त्याचे संपादन श्रीअरविंदांनी केले. राष्ट्रवादीने त्यांची बैठक भरविली व त्यांचे हे मुखपत्र झाले. श्री अरविंद संपादनाचे कार्य करीत, मात्र संपादक म्हणून त्यांचे नाव येत नसे. श्री अरविंद कारावासात गेल्यावर या पत्रावर बंदी आली कारण त्यात एक प्रक्षोभक लेख प्रसिद्ध झाला होता.

दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या राष्ट्र सभेच्या अधिवेशनाला श्री अरविंद व सहकारी उपस्थित होते. स्वराज्याची मागणी करणारा ठराव ह्या सभेत प्रथमच संमत करण्यात आला. स्वराज्य म्हणजे संपूर्ण स्वातंत्र्य. परंतु मवाळांनी मात्र त्याचा अर्थ वसाहतींचे स्वराज्य असाच लावला.

(क्रमश:)

**शं.बा.मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३ २०३०

मा. संपादक
'व्ही. पी. एम. दिशा' यांना
स.न.बि.वि.

आपण नुकताच पाठविलेला नोव्हें. २००६ चा अंक मिळाला. अंक माहितीपूर्ण आहे. सूची साहित्याचा नमुना पाहिला. असे उपयुक्त ठरणारे लेखन आपले मासिक प्रसिद्ध करीत असते ही गौरवाची बाब आहे.

आपल्या या वाटचालीस मन:पूर्वक शुभेच्छा.

आपला
पुरुषोत्तम पाटील
संपादक कविता-रती

चित्रपावली

# या चित्रांमागे दडलंय् काय ?


*चित्रकला या अभिव्यक्तिप्रधान विषया संबंधातील, 'चित्रपालवी' सदरामधील पुढील लेख या अंकात देत आहोत. - संपादक*

'मन एवढं एवढं जसा खसखसाचा दाना, मन केवढं केवढं त्यात आभाय माइना' बहिणाबाईंची 'मना' बद्दलची ही कविता बरंच काही सांगून जाते. मनाच्या श्लोकातही मानवी मनाचा त्या मनात सतत उमलणाऱ्या सर्वच विचारांचा खोलवरचा वेध समर्थांनी घेतला आहे. अशा या मनाला उच्च पातळीवर नेण्याचे सामर्थ्य ललित कलांमध्ये आहे. त्यातही चित्रकलेचे आहे. लिपीचा जन्महीं चित्रकलेतूनच झाला. जगात अनेक खुणा, संकेत चित्रांद्वारे व्यक्त होतात. मनातील विचार व्यक्त करण्याचे आणि सृजनशीलतेचा आनंद देण्याचे दुहेरी काम चित्रकला करते. फुलांच्या एखाद्या दुकानाजवळून जाताना येणारा सुगंध जसा आपल्याला आनंदित करतो, तसेच कलेचेही आहे. जीवनातल कलेचा स्पर्श कळत नकळत आपल्या मनाला आनंदित करून जातोच.

सुप्रसिद्ध इंग्रजी नाटककार बर्नार्ड शॉ यांनी ललितकलांबद्दल मार्मिक अभिप्राय दिला आहे. ते म्हणतात, "I am simply calling attention to the fact that fine art is the only techer except torture" (कष्टाशिवाय शिक्षण देणारी एकमेव शिक्षिका म्हणजे ललितकला.)

चंचलत्व, क्रौर्य, न्यूनगंड, असहायता अशा अनेक प्रकारच्या मानसिक विकृती या आजच्या समाजातील प्रकर्षाने आढळणाऱ्या समस्या नाहीशा करायच्या असतील तर जीवनाला क्रियाशीलतेचे वळण लावणे आवश्यक आहे. हे वळण लावण्याचा साधा सोपा उपाय म्हणजे मुलांना सुंदर गोष्टींत रमण्याची, स्वत:मध्ये रमण्याची, संधी देणे, ही संधी चित्रकलेद्वारे देता येते. निर्मितीशिवाय माणूस, म्हणजे पोतेरं.

माणसाचं मन रहस्यमय आहे. त्यातूनही बालकांचं मन अधिकच रहस्यमय; मुलांच्या मजेदार बोलण्यातून, खेळण्यातून, क्रियांमधून आपण हा अनुभव घेत असतो. त्यांच्या मनाचे विविधरंगी खेळ कधी चित्रकलेतूनही पाहायला मिळतात. त्यांच्या भिंतीवरच्या रेषा या नुसत्याच रेषा किंवा गिचमिड नसते तर त्यातच त्यांचा चांदोबा, सूर्य, झाड लपलेलं असतं. कधी ती स्वत:च त्या चित्रात दिसतात.



**चित्र क्रं. १: नलिनी आणि तिच्या मैत्रिणी**


(चित्र क्र. १) रेषांमधील मन आपल्याला कळत नाही. किंबहुना आपण ते समजून घेण्याचा प्रयत्न करीत नाही आपण आपल्याच अडाणीपणातून त्यांच्या सृजनात्मक आनंदावर विरजण घालत असतो.

मुलांना समजून घ्यायचं तर, चित्रकलेसारखं दुसरं साधन नाही. कारण मूल आपले विचार चित्रांद्वारे प्रकट करते, चित्रातून त्याच्या मनोव्यापारची झलक समजते. तसेच आपला राग, लोभ, द्वेष इत्यादी भावनांचा निचरा चित्रांद्वारे करते. याबाबतचे काही अनुभव, किस्से असे.

इ. दुसरीच्या वर्गावर तास होता. गप्पा मारता मारता चित्राचा विषय ठरला 'माझी आई' मुलांच्या भावविश्वाशी निगडित विषय. त्यामुळे मुले चटकन कामाला लागली. प्रत्येकाच्या मनातली आई कागदावर आकार घेत होती. कुणाच्या आईने रंगीबेरंगी फुलांची साडी नेसलेली तर कुणाच्या आईने आपल्या अंबाड्यावर फुले घातलेली. कुणाची आई बाजारात चालली होती. तर कुणाची आई घरकामात व्यस्त. इतक्यात माझे लक्ष मागे बसलेल्या एका विद्यार्थ्याकडे गेले. तो अगदी दात ओठ खाऊन चित्र रंगवत होता. माझी उत्सुकता चाळवली गेली. इतर चित्रांकडे लक्ष न देता तडक त्याच्याजवळ गेले. पाहाते तर पूर्ण चित्र लाल रंगात रंगवत होता तो. त्याबाबत त्याला जवळ घेऊन विचारले असता तो म्हणाला, 'मला नाही आवडत माझी आई. सारखा अभ्यास कर म्हणते. चित्र काढूच देत नाही.''

याच संदर्भातील दुसरा किस्सा असा. एका स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून गेले असताना संयोजकांच्या विनंतीवरून वर्गावर्गात फेरी मारली. स्पर्धेचा विषय होता, 'स्वयंपाकघरात काम करणारी आई' विद्यार्थ्यांचे निरीक्षण





चित्र क्रं. १ (अ) : डोंगर, सूर्य, चंद्र, ढग, तळे, झाड यांचा देखावा

आणि कल्पनाविलास पाहून आश्चर्य वाटले. आनंदही झाला. आईबरोबर स्वयंपाकघर तपशिलात दाखवण्याचा प्रयत्न छानच होता. एका मुलीने आईचे चित्र काढताना कानच काढले नाहीत. म्हणून तिला विचारले तर चिमुरडी म्हणते कशी, 'गेले कित्येक दिवस आईकडे नवीन रंगपेटी मागते आहे. पण तिला ऐकूच जात नाही बहिरी आहे ती मी मात्र तिचे सारे एकायचे.'

वरील दोन प्रसंगावरून आपल्या लक्षात आलेच असेल की आपल्या मनातला राग या दोन विद्यार्थ्यांनी चित्राद्वारे प्रकट केला. कलेमध्ये मुलाला खिळवून ठेवण्याचे सामर्थ्य आहे. रंजकता आहे. मुक्त मनाने काढलेल्या चित्रात मुले आपल्या भावना ओतू शकतात. कलेचा मुक्ताविष्कार, मुलांकडून त्याचे स्पष्टीकरण, त्यांचे भाष्य म्हणजे मुलाच्या मनाची पारदर्शिकाच ठरते. कला हे माध्यम जात्याच गतिशील. ते मुलांच्या हातात दिल्यावर नवे आविष्कार साकार करतात.

**सौ. मंजिरी दांडेकर**
मधु-मिलिंद बिल्डिंग, घंटाळी रोड
नौपाडा, ठाणे (प) ४००६०१.
दूरध्वनी क्रमांक : २५४१ ४५३९

# ज्ञानपीठ पारितोषिकानिमित्त मराठी कवितेला अनोखा मानाचा मुजरा

## डॉ. महेश केळुसकर : वाङ्मय संपदा (भाग २)

(मागील अंकावरुन पुढे)

**अप्रकाशित साहित्य-कविता**

३०/१/७५ फुले फुलली रंगी ■ १३/४/७५ निळे पक्षी ■ २२/८/७५ जुईली ■ १४/९/७५ जखम ■ ०८/१०/७५ सूर्य जेव्हा ■ १२/१०/७५ चंद्रज्योत (प्रसिद्धी - 'सुरंगी भित्तीपत्रिका') ■ १८/१०/७५ चुकलेले अंदाज ■ ८/१०/७६ प्रकाशफुले ■ १९७६-७७ आभाळावर साच - 'खमराजांस' ■ १४/४/७७ अक्षरांशी खेळताना ■ २६/३/७७ गाव पहाटेची सय ■ १३/१२/७६ कोकण ■ १४/२/७७ सूर्य अस्ताला जात असताना ■ १७/३/७७ जन्म नाही अस्त नाही ■ २९/१/७७ सारे गाती गाणी ■ २२/५/७७ लाडकी आजी ■ १९७७ माकड ते माकड ■४/७/७७ संध्याकाळी ■२४/८/७७ इश्क ■ २६/९/७७ ओलेते आव्हान ■ १/१०/७७ काळोखाची गुंतवळ ■ २४/१०/७७ चांदण्या रात्रीत ■ ३१/१०/७७ वेडापिसा ■ ४/११/७७ सायंकाळी निळ्याभाळी ■ ९/११/७७ एक घास ■ १७/११/७७ पियूपा ■१८/११/७७ भर ओसरत जाई ■१८/११/७७ काळोखाचे व्यास ■ १४ /१२/७७ का असे अस्वस्थ व्हावे? ■ १४/१२/७७ ती ■१९७७ भास असे ■ ३/२/७८ आठवणी ■ ३/२/७८ सांजवेळी ■ ११/२/७८ एव्हाना दिशा दरीत कोसळल्या होत्या. (सावंतवाडी) ■ २६/२/७८ मोहरलेले काहूर (सावंतवाडी) २८/३/७८ तिचे डोळे (सावंतवाडी) ■ १/४/७८ चंद्रम पडतो पाण्यात (फोंडाघाट) ■ ११/४/७८ हलकिशी सर आली (सावंतवाडी) ■ १८/४/७८ कमल पापण्यात ■ २८/४/७८ मी अशा उजाड माळरानावरुन ■ ९/५/७८ विझत चाललेला एक म्हातारा ■ १४/५/७८ तिच्या आठवणींची फुले ■ १६/५/७८ दिशा गुलाबी झाल्या ■ १८/५/७८ नटून-थटून अंग चाटून बीज जेव्हा जाते ■ २८/५/७८ शब्दुली ■ ४/६/७८ अंगाई ■ १९७८ आभाळ असे ■ १९७८ आसतत जसवर शितां (झिनझिनाट पृ. ३७) ■ १२/१२/७७ राघू-मैना ■ १०/६/७८ हीर इल्यार व्हाळाक ■ २१/६/७८ आई ■ ६/८/७८ हळुवारपणे... ■ ९/८/७८ क्षमा असो द्यावी त्यासी ■ २३/८/७८ काही कळत नाही ■ २५/९/७८ गाण्यातुनि नभ झरझरते... ■ ६/१०/७८ सरणयातना ■ ४/११/७८ झाडावरती पांघरताना ■ ७/११/७८ अस्तंगत होण्याच्या वाटेवर ■ २१/११/७८ केव्हा केव्हा तंद्रीत ■ ३/१२/७८ तर असे हे मधेच तुटणे ■ १/३/७९ कुठल्या पापाची फळे ■ ६/४/७९ खुळी ग कशि ■ ११/४/७९ आम्ही इथे (मी इथे) ■ ७/४/७९ धकलो आमचो, थनूझ्वेन हा (झिनझिनाट पृ. ३९) ■ १०/६/७९ किती साहू ? ■ ११/६/७९ मग ती ही वाहे खळखळ ■ २/८/७९ तोल ■ १/७/७९ तुकाराम आज असता (प्रथम पारितोषिक) ■ १८/८/७९ चार गावचे चार वेडे ■ २५/१०/७९ अभंग ■ २५/१०/७९ मी छिन्न ■ २/११/७९ सून गेली फाशी ■ ३/११/७९ बुझत गेले मन ■ १९/११/७९ सये, तुझी तंग चोळी ■ १९७९ अमुक तमुक वात्रटिका ■ २२/२/८० सांडल्या गायी कुणाच्या ■ २६/२/८० तरीही फुलते कातरवेळी ■ ६/२/८० वैतागवस्त्या ■ २६/२/८० न्हवरदेव सोबवला (झिनझिनाट पृ. १७) ■ १०/३/८० बलात्कार : एक अध्यात्मिक अनुभूति ■ १३/३/८०

नाही आणि होय ■ १३/३/८० तो हिमनगासारखा ■ १९/३/८० पर्याय ■ १९/७/८० तोवर चांदण्यांची गाणी सुरक्षितता (रत्नागिरी-जयगड प्रवास) ■ २३/८/८० रात्री समजूतदार झाल्यात आता ■ २४/८/८० फास ■ २५/८/८० भरती ■ २८/८/८० कुणावर टाकावा भार? ■ ३१/८/८० पात्याची धार निवाली ■ ३१/८/८०प्राण भारावत ■३१/८/८० घुसळते रात्र अंगात ■ १/९/८० हुन वाय लागता काय (झिनझिनाट पृ. ३८) ■ २/९/८० झाडे उदासली ■ ११/९/८० मी प्राण सोडला तेव्हा ■ १४/९/८० उंट ■ १४/९/८० मला फुलांचा सोस ■ २०/९/८० म्हणजे मग ... ■ २१/९/८० सवयीने सगळे ■ ३०/९/८० तरी विहिरीला द्या ■ २८/१०/८० ■ हे चंद्र-बिंद्र ■ १५/७/८० कविवर्य ■३०/१०/८० म्हाताऱ्या पर्वतांच्या सुरकुत्या ■ ३१/१०/८० आता पांढरे शुभ्र पोपट ■ ३/११/८० अलिकडे बरेचदा ■ १०/११/८० आजोबा ■ १८/११/८० तुझ्या आमरण उपोषणाकडे ■ २०/११/८० जन्मासी यायचा कोणी ■१/१२/८० कशी छान थट्टा झाली ■ २/१२/८० होऊ द्यात नंगेपण उघडे ■ ७/१२/८० 'फॉर्म्युला' : दिनांक सात, बारा, दोन हजार ऐंशी ■ ९/१२/८० डोळा ■ २०/१२/८० म्हणून म्हणतो ■ १८/१२/८० बोट ■ १८/१२/८० उदाहरणसंग्रह : प्रकृती, संस्कृती आणि विकृती ■ २०/१२/८० वास ■ १८/१२/८० तुझे डोळे ... जानेवारी १९८१ फोड ■ ६/१/८१ होळी पौर्णिमेच्या रात्री ७/१/८१ ■ ही सगळी घाई ■ ८/१/८१ आम्ही तुझेच भिकारी ■ २४/१/८१ उन ■ ४/२/८१ निळ्या नग्न धारात ■ १२/२/८१ मी मोर पाहिले ■ १२/२/८१ गोडाऊन ■ १४/२/८१ मालन म्हणते कशी... ■ १९/२/८१ महाराणीच्या राज्यांत ■ ८/३/८१ पांढरी शुभ्र दु:खकमळे ■ ८/३/८१ नाही म्हटले तरी... ■ १०/३/८१ फूल ■१९/३/८१ पंचांग ■१९/३/८१ एखाद्याच्या प्राक्तनात ■ २०/३/८१ पावा ■ २१/३/८१ प्रार्थना ■ २१/३/८१ त्यांचा काही नेम नाही ■ २५/३/८१ मिर्गादिसा ■ २५/३/८१ मांसाहारी हत्तींचा कळप ■ २७/३/८१ एक एक निस्पंद पाकळी ■२५/३/८१ डोळ्यांबद्दल काय सांगायचं... ■२६/३/८१ ती पहाट ■ २७/३/८१ बर्मदेवान गाट मारली (झिनझिनाट पृ. २३) ■ २७/३/८१ शेगूल ■ २७/३/८१ जल्मा येवचा (झिनझिनाट पृ. ३१) ■ ४/४/८१ निर्वासित ■ २५/४/८१ पक्षी उडून नाही जात ■ २५/६/८१ दारिद्र्य ■१३/१०/८१ लोक म्हणतात ■१३/१०/८१ रावे उडतील ■ ११/११/८१ फुलाफुलांचे कवतिक तिच ■ १९/११/८१ तिच्या गालावरची फुले ■ १९/११/८१ दु:ख ■ ९/१२/८१ कवी उभा असतो, तो तुमच्या मर्जीचा प्रश्न (फोंडाघाट), आठवणी तुझ्या... (फोंडाघाट) ■ १०/१२/८१ टेंबावयलो वावलो (झिनझिनाट पृ. २६) ■ १०/१२/८१ व्हनीवाय जून्यार दी गे (झिनझिनाट पृ. ४६) ■ ७/१२/८१ बेबल्याक असा ठावक (झिनझिनाट पृ. २२) ■ ७/१२/८१ देवबाग पानयात गेला (झिनझिनाट पृ. ४१) ■ ७/१२/८१ येक व्हतो आजो (झिनझिनाट पृ. २७) ■ ७/१२/८१ सुमला लय मगो आकडाक लागला (झिनझिनाट पृ. ९) ■ १०/१२/८१ अबोलेचो वेळसार टाळयेर गो (झिनझिनाट पृ. २०) ■ जानेवारी १९८२ रान ■ १/२/८२ मी कुणास सांगू ■ ८/२/८२ जीव झोकून द्यायच्या वयात ■ २६/३/८२ एका कवीच्या प्रेमभंगाची गोष्ट ■ १/४/८२ चंद्रतीळ (सांत्वन) ■ १८/४/८२ अतोनात दु:खाचा पाऊस, माजा नशिब फुटक्या वाय (फोंडाघाट) ■ १/५/८२ आपली लाडकी लोकशाही ■२/५/८२ संकेत ■६/५/८२ झरिया ■ १३/५/८२ जीव लावावा जीवे भावे ■ ६/६/८२ प्रेमभंग : काही प्रकरणे ■ ९/८/८२ प्रेयसी ■ १०/९/८२ कोडे ■ १९/९/८२ तू घाव घातलास ■ २६/९/८२ तसं आतल्या आत आयुष्य ■ २६/९/८२ पथ्य

■ १/१०/८२ सासूबायका सांगाक काय जाता ■ २०/१०/८२ तू तरी सांगशील का ■ १८/११/८२ या फांदीवरुन त्या फांदीवर ■ २८/१२/८२ विजनात रे मनाच्या ■ २९/१२/८२ मोरपीस ■ ५/१/८३ फुलं (इतकं सगळं) ■ ८/१०/८४■ साद २२/८/८५ अश्रु ■ ६/९/८५ झाड ■ ९/४/८६ अर्धा आवळा ■ २९/११/८६ पाऊस ■ ७/१/८७ चंद्रकाया ■ २७/१/८७ अदृश्य झाड ■ १/६/८७ या विमनस्क संध्याकाळी ■ २४/२/८७ पैलतारी ■ ६/१०/८७ मोहोळ ■ ३०/१०/८७ खेळण्याचे दिवस होते ■ ३१/१०/८७मुंबई दर्शन (अपूर्ण) मिळून, सान्याजणी-दिवाळी ९३ ■ ४/१/८९ कृष्ण ■ १७/१/८९ ती ■ २९/६/८९ आणि नंतर मग ■ २७/८/८९ नितळ ■ ५/२/९० रस्ता ■ १५/४/८५ सुमस्ता, द्विपदी सेतु, होतो मी ही दरबारात तुझ्या राजू ■ २८/३/९० जात ■ नोव्हेंबर ८९ बोलतात आमच्याशी झाडे, दिल पे मेरा ■ ५/४/९० निरोप ■ २/६/९० देवकेळ ■ ४/८/९० चिमणी ■ १२/८/९० तडजोड ■ ३/९/९० सुरुंग ■ २/१०/९० फिर भी दिल में ■ ८/१०/९० पावसा असा काय केलंस? (झिनझिनाट पृ. ४३) ■ १०/१/९१ मुंबई ■ १३/१/९१ धर्मभास्करा प्रणाम ■ १८/२/९१ पहारा, टोपी ■ १९/११/९० चंद्र उदेला, रंग, शारदाच्या चांदण्यात, फ्रावकू (झिनझिनाट पृ. २४), चाड ■ १०/८/९१ खेळ ■ ऑगस्ट ९१ मना सज्जना ■ १४/५/९० अशा उन्हातून, उन्हाळा (कविता कृष्णमूर्ती, श्रीनिवास खळे-मुंबई आकाशवाणीवर सादर), चांद टिपूर, दिवा (अरुण म्हात्रे यांच्या 'तुला हवा तसा दिवा आणू कुठून' या गझलचे विडंबन) ■ २६/२/९२ किती सुरेख ■ १९/४/९२ मधुघट ■१०/५/९२ दगडी मनावरची रेख ■पाणी २१/७/९२ दोर ■२७/१०/९२ रानात झिम्म पाऊस ■६/११/९२ ऊन तान्हे ■ ७/११/९२ झुंज ■ २३/१२/९२ टेलिफोनवरुन ■ १९/२/९३ झुळुकसा ■ १७/८/९३परिवर्तन वगैरे किडुक-मिडुक (सुजन दिवाळी ९३) ■ २९/९/९३ हालचाली

### अप्रकाशित साहित्य-कथा

१) जोर की लगी है यार.

### नाटक

१) एक होतं लोकापूर (लोकनाट्य)

२) लूट (दोन अंकी नाटक)

३) पयलो नंबर (मालवणी एकांकिका)

४) आम्ही कोण म्हणोनि काय पुसता (विनोदी एकांकिका)

### दूरदर्शन मालिका

१) सूर्यफूल (पटकथा/संवाद) अप्रदर्शित

२) छय्या, छय्या. (कथा/पटकथा/संवाद) अप्रदर्शित.

### ध्वनिफित

१) शिरी गनेस देवाची कवना

### कार्यक्रम

१) मुंबई नगरी बडी बांका. (मुंबई नगरीच्या कविता आणि गाण्यावर आधारित) संकल्पना, लेखन व दिग्दर्शन. संगीत - अभिजित लिमये आणि मधुवंती पेठे. निर्मिती - मुंबई मराठी साहित्यसंघ आणि नादब्रह्म - बोरिवली.

२) माझा आवाज (Voice Culture Workshop) प्रत्येक रविवारी (ऑक्टो. ०४ ते डिसें. ०४) २५ विद्यार्थी. स्थळ: सोशल सर्व्हिस लीग शाळा, परळ.

३) सूत्रसंचालन. नाद ब्रह्म. सावंतवाडी. रौप्यमहोत्सव १९ जाने. २००३. गोविंद चित्रमंदिर, सावंतवाडी.

## लेखकाविषयी

### व्यक्तिपर

१) भावे, धनंजय. साहित्य संस्कृती मंडळ व नवकवी केळुसकर. (लक्षवेधी -लक्ष्यभेदी सदरात) दै. रत्नभूमी ७ सप्टें. १९८५.

२) जांभळे, परेन शिवराम. झिनझिनाट. बहुश्रुत दिवाळी २००३. पृ. ५८-६५.

३) - मजल-दरमजल. गौड ब्राह्मण दीपावली विशेषांक २००४. पृ. ५९-६२.

### मुलाखती

१) मनस्वी कलावंत महेश केळुसकर. (संवादिनी) विवेक दिवाळी १९९३. पृ. ११७-११९.

२) दि. प्र. तुम्हीही (थेट भेट सदर - शेखर देशमुख) लोकसत्ता २ डिसें. १९९९.

३) माय मराठीचा हा सन्मान ('आडाचं पाणी किती खोल' ला राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल - नंदकुमार रेणो) लोकमत ९ एप्रि. २००६.

### काव्यविषयक लेख

१) ठाकूर, विवेक बाळकृष्ण. महेश केळुसकर यांची कविता. आरती वर्ष ८ ऑग. १९९०. पृ. ११-१३.

२) काळसेकर, सतीश. अत्त दीप भव. ('रात्री-बेरात्रीचे भास' या कवितेविषयी) वृत्तमानस १५ फेब्रु. १९९८.

३) ................ महेश केळुसकर यांच्या कवितेतला झिनझिनाट. दै. पुढारी १० मार्च २०००. (सोबत ४ कविता. (१) झिनझिनाट (२) माणसे (३) धावा (४) खेळण्याचे दिवस होते.)

४) चाळके, वैभव. देऊळ उमलते तुझ्या शुभ्र उदराचे. तरुण भारत १० ऑग. २००३.

### परीक्षणे

### मोर

१) पिंगे, रवींद्र. पुस्तक पर्व. मटा. ६ जाने. १९८६.

२) फणसेकर, अविनाश. महेशाच्या प्रतिभेचा थुईथुई नाचणार 'मोर' दै. नवकोकण. १ मार्च १९८६. पृ. २.

३) सामंत, भारती ......... दै. सागर. २० एप्रि. १९८६.

४) दिवाडकर, भालचंद्र. हिरव्यागार निसर्गात रमलेली नृत्यविभोर कविता : मोर. दै. सागर २० एप्रि. १९८६.

५) कांदोळकर, सचिन. मनाला थुईथुई नाचावला लावणारा 'मोर' काव्यसंग्रह. नवप्रभा २४ ऑग. १९८६. पृ. ५.

६) देशपांडे, एच. व्ही. महेश केळुसकरांचा मोर. तरुण भारत ९ नोव्हें. १९८६.

### पहारा

१) तापस, विजय. स्वत:वरच 'पहारा' महानगर ३ जाने. १९९६ पृ. ९

२) कुलकर्णी, रविप्रकाश. केळुसकरांचा आता पहारा. चित्रलेखा १५ एप्रि. १९९६. पृ. २९.

३) ......... टोकदार जाणीवांचा कवितासंग्रह. नवचैतन्य २० एप्रि. १९९६. पृ. ५.

४) बापट, संगीता. वर्तमानाचे विदारक चित्र : पहारा. साधना १८ मे १९९६. पृ. १५-१६

५) ओगले, अविनाश. उपरोधाने नटलेला राजकीय कवितासंग्रह. असरयात्रा २६ मे १९९६ पृ. ७.

६) राणे, बाल. उपहासगर्भ कविता. सकाळ १६ जून १९९६ पृ. ६

७) जोग, विवेक. पहारा. ललित ऑग. १९९६ पृ. ५६-५७.

८) भागवत, दुर्गा. राजकीय सामाजिक भान असलेली कविता. मटा २९ सप्टें. १९९६. पृ. ४

९) जोशी, सुरेश. उपरोध संपन्न कवितेचा नवा अवतार. सुगंध सरिता दीपावली १९९६ पृ. २६६-६७.

१०) भुवड, देवानंद. जीवनाचे वास्तववादी दर्शन घडवणारा पहारा. सामना. २४ नोव्हें. १९९६.

११) जाधव, अशोक नारायण. राजकीय कवितांचं नव दालन खुला करणारा 'पहारा'. नवशक्ती ८ डिसें. १९९६.

१२) कारंडे, हेमंत. स्वयंघोषित संकटांना जाहीर आमंत्रण देणाऱ्या दाहक कविता.


## झिनझिनाट


१) ................ मालवणी कवितांचे 'झिनझिनाट'. सांजदिनांक १४ फेब्रु. १९९८. पृ. ४-५.

२) नाडकर्णी, कमलाकर. वेगळ्या चालीचा आणि बोलीचा झिनझिनाट. लोकसत्ता ७ जून १९९८. पृ. ६.

३) सारडा, शंकर. मालवणी बोलीतील नाट्यपूर्ण गीतांचा हृदयंगम 'झिनझिनाट'. देशदूत २३ ऑग. १९९८.

४) पेडणेकर, आ. ना. हसणाऱ्या माणसाच्या जीवनातील कारुण्य. महानगर २४ ऑक्टो. १९९८.

५) कदम, मनोहर. मालवणी मुलखाच्या सुखदुःखाचा डवुला. मटा. २२ नोव्हें. १९९८.

६) कुलकर्णी, रविप्रकाश. केळुसकरांचा झिनझिनाट. चित्रलेखा .......... पृ. ४५.

७) दाभोळकर, लता. सोप्या कविता. ...........

८) .......... झिनझिनाट : अस्सल मालवणी कवितांचा डवूला. माध्यम. ..........


## मी (आणि) माझा बॅंडबाज्या


१) कलंदर. चारोळी नि चेदाणे. (कानोकानी सदरात) मटा २१ मे १९९५.

२) Raikar, Sumedha. Bards takes bank loans to published Poetry. Indian Express. Bombay 25th May 1995.

३) जाधव, शोभा. चारोळी नि आरोळी. (पत्र) मटा ४ जून १९९५. पृ. ६.

४) .......... काव्याच्या प्रांतात चारोळ्यांचा बॅंडबाजा. केसरी ५ जून १९९५ पृ. ५.

५) गजेंद्रगडकर, मोनिका. साहित्यचर्चा. लोकप्रभा २८ जुलै १९९५. पृ. ५४.

६) कुलकर्णी, रविप्रकाश. केळुसकरांचा बॅंडबाजा. चित्रलेखा १४ ऑग. १९९५.

७) मुळे, शकुंतला. चारोळ्यांची टोळी आणि केळुसकरांचा 'बॅंडबाजा'. मुंबई तरुण भारत. ........

८) ओगले, अविनाश. पुन्हा एकदा बॅंडबाजा. ..........


## कवितांच्या गावा जावे


१) .......... सादरीकरणाची कविता. (चाळता चाळता-सदर) नवशक्ती २८ एप्रि. २०००.


## साप्-टांग-नमस्कार


१) भेंडे, सुभाष. मार्मिक, मिश्किल आणि खिल्ली उडविणारी इरसाल मानपत्रे. नवशक्ती ७ जाने. २००१.

२) सुखटणकर, सुधीर. खुमासदार मानपत्रं. महानगर १७ मार्च २००१.

३) नाईक, सदानंद. इरसाल लेखनाचा वाचनीय नमुना. मटा १८ मार्च २००१.

४) सोनसुरकर, चंद्रशेखर. समाजातील ढोंगांचं वेधक चित्रण. सामना १० जून २००१.

५) प्रभू, प्रसाद. टांग मारणारा साप्-टांग-नमस्कार. अक्षरयात्रा १० जून २००१.

६) बेजकर, प्रमोद. साप्-टांग-नमस्कार : एक पत्रानुभव. तरुण भारत २४ जून २००१.


## कलमबंदी


१) डोंगरे, अनिल. आस्वादक लेखन. मटा ९ जून २००२.

२) .......... आस्वादक भूमिकेची समीक्षा. नवशक्ती २८ जुलै २००२.

३) राणे, बाळ. स्वतंत्र विचारशक्तीची 'कलमबंदी'. सकाळ ११ ऑग. २००२.

४) गायकवाड, राहूल. वेगळ्या पठडीतले समीक्षालेखन. तरुण भारत १३ ऑक्टो. २००२. पृ. २.

५) पटवर्धन, सतीश. केळुसकरांच्या 'कलमबंदी'चा कळ साध्याय! लोकसत्ता. ............

## डोंगर चालू लागला.

१) ओगले, अविनाश. वेगळ्या वळणाच्या बालकथा. ...............

## महानायक मालिका

१) अवसरीकर, स्नेहा. 'महानायक' ची महामालिका बनते तेव्हा .... अंतर्नाद जाने. २००३ पृ. ४१-५२.

२) विश्वासराव, मंगेश. पाटलांच्या 'महानायक'ला सलाम. सकाळ २४ एप्रि. २००२. पृ. १०.

३) पाटणकर, राजेंद्र. आकाशवाणीवर 'महानायक' महामालिका. तरुण भारत ५ मे २००२. पृ. ५.

४) शिरवडकर, वैभव. प्रसिद्धीचा आणि विक्रीचा उच्चांक गाठणारा 'महानायक'. विवेक ११ ऑग. २००२. पृ. ४३.

५) यादव, विजय. महानायक : डोळे मिटून चित्रपट. असर संवेदना २००२. पृ. २०-२४.

६) सोनावणे, सुहास. महानायक एका लेखकाचे ध्यासपर्व. लोकसत्ता .......

## वादविवाद

१) वडेर, प्रल्हाद. 'सकळ' साहित्य संमेलन हा स्टंटच! (पत्र) मटा २८ जाने. १९९९.

२) उजगरे, निरंजन. अ.भा. संमेलनाला पूरक म्हणून. (पत्र) मटा २८ जाने. १९९९.

३) पत्र. (रुचीच्या जुलै २००५ मधील 'बरबरची रंगरफेती आणि मराठी अस्मितेचा घोष' या लेखावर 'कुसुमाकर' सप्टें. २००५ मध्ये 'छंदीफंदी' या टोपणनावाने टीका, त्या संदर्भात.) रुची. .....

४) छंदीफंदी. केळुसकरांचा 'स्व-द्वेष' कुसुमाकर सप्टें. २००५ पृ. ९-१३.

५) येले, किरण. छंदीफंदीचा लेश न पटणारा. कुसुमाकर डिसें. २००५ पृ. १६-१७ (सोबत 'रुची' मधील पत्र)

६) सुतावणे, उल्हास. अमुचा स्वहिताचा धंदा! (पत्र) (महानगरच्या ३ जून १९९५ च्या लेखावर) महानगर......

## इतर

१) मुलाखत. ई-टी.व्ही. २ ऑक्टो. २००२.

## इतर भाषिक अनुवाद

कवितांचे अन्य भाषांमध्ये झालेले अनुवाद

**English**

१) वेल. reeper tr. by Bhagwan Thag. Modem Marathi Poetry. Jan. 1987.

२) मिसळ भिनत चाललीय. Deliverance, झिनझिनाट Hullabaloo, गावाच्या बाजूने कौल On the side of a village. Tr. by Vishwas Patil. 'Indian Literature'. May 2005.

## हिंदी

१) पक्षी उडून नाहीत जात. पक्षी उड़कर नही जाते. अनु. चंद्रकांत बांदिवडेकर. 'दस्तवेज' एप्रि. जून १९९३.

## मल्याळम

१) चिमणी मेली इथलीशी

## अप्रकाशित अनुवादित कविता

१) तुझा नीरव पायरव. Yours Silent foot steps. tr. by. A. N. Pednekar.

## मानचिन्हे

१) महाराष्ट्र कला निकेतन - महाराष्ट्र गौरव पुरस्कार २००२.
२) पद्मश्री भाऊसाहेब वर्तक पुरस्कार
३) महाराष्ट्र शासन राज्य पुरस्कार २०००-२००१
४) ७९ वे मराठी साहित्य संमेलन-सोलापूर (२७, २८,२९ जाने. २००६)
५) लोकमान्य टिळक व्याख्यानमाला २००१ (टिळकनगर शिक्षण प्रसारक मंडळ- डोंबिवली)
६) कवी आनंद फंदी प्रतिष्ठान - संगमनेर (२०-११-२०००)
७) ७८ वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन - कणकवली (२ व ३ मे १९९८)
८) सार्वजनिक वाचनालय - कल्याण/शतकोत्तर रौप्य महोत्सव
९) नादब्रह्म रौप्यमहोत्सव समारोह २००३ - सावंतवाडी
१०) 'मैत्रेय' / 'मुक्त संवाद'
११) ९ वे कोकण मराठी साहित्य संमेलन-ठाणे (७,८,९ जाने. २००५)
१२) World Aids Day. (1-12-2005) - Mumbai Districts Aids Control Society and BMC
१३) कोमसाप मुंबई जिल्हा संमेलन (१८ व १९ फेब्रु. २०००)
१४) कोमसाप-रत्नागिरी शाखा / कविसंमेलन (२३ ऑक्टो. २००४) (प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक)
१५) समताविद्या मंदिर - रौप्यमहोत्सवी वर्ष (२००३-२००४)
१६) ४ थे मालवणी बोली साहित्य संमेलन (कसाल-सिंधुदुर्ग/ ८ नोव्हें. २००३)
१७) शिवसेना ठाणे जिल्हा शाखा आयोजित 'सुप्रभात सन्मान चिन्ह' (७ व ८ जून २००३)
१८) दया पवार स्मृती पुरस्कार (एकता कल्चरल अकादमी - २००५-२००६)
१९) 'जागतिक मराठी परिषद' व 'सह्याद्री वाहिनी' आयोजित कविता उत्सव (२७ फेब्रु. २००६)
२०) 'प्रतिभा संगम' (८ वे राज्यस्तरीय विद्यार्थी साहित्य संमेलन - १२, १३, १४ डिसेंबर २००३)
२१) कोमसाप - डोंबिवली शाखा सन्मानचिन्ह
२२) ७ वे कोकण मराठी साहित्य संमेलन - वसई (१५, १६ डिसेंबर २००१)
२३) आझाद हिंद मंच - पुणे/नेताजी सुभाषचंद्र बोस - १०५ वी जयंती (२३ जाने. २००२)
'महानायक' या आकाशवाणी महामालिकेची निर्मिती
२४) 'पुणे फेस्टिवल' (६-१५ सप्टेंबर १९९७)
२५) ७८ वे अ.भा.मराठी साहित्य संमेलन-नाशिक (२००५)
२६) University Student Council (Workshop. 2005-2006)
२७) ५ वे कोकण मराठी साहित्य संमेलन (नवी मुंबई - २६, २७, २८ डिसें. १९९७)
२८) कोमसाप - खंड शाखा/ पहिले रत्नागिरी जिल्हा साहित्य संमेलन (९ व १० मार्च २००२)
२९) ७० वे अ.भा. मराठी साहित्य संमेलन - अहमदनगर (३, ४, ५ जाने. १९९७)
३०) 'बिझनेस एक्सप्रेस' - सांगली/राज्यस्तरीय साहित्य - विशेष सेवा पुरस्कार २००४
३१) Honour for 'Search in Excellence' / Silver Jubilee Saraswat Sammelan - Au India Saraswat Foundation (21- June 1997)
३२) 'कल्पक ग्रुप' सन्मानचिन्ह
३३) कोमसाप + वि.स. खांडेकर विद्या प्रतिष्ठान

आयोजित वि. स. खांडेकर जन्मशताब्दी समारोह (१०-०५-१९९७)

३४) केसरी-मराठा संस्था, पुणे ('महानायक' निर्मितीसाठी - २३ जाने. २००१)

३५) Radio & TV Advertising practitioners' Association All India Award - 2003 'अंत्यवस्त्र' या रेडिओ निर्मितीसाठी (मुन्शी प्रेमचंद यांची मूळ हिंदी कथा - 'कफन')

३६) दि अभिनव सहकारी बँक लि. डोंबिवली रौप्य महोत्सव - २००० (उल्लेखनीय योगदान)

३७) चिंचणी तारापूर एज्युकेशन सोसायटी, चिंचणी-ठाणे (प्रमुख पाहुणे)

३८) आचार्य-मराठे कॉलेज, चेंबूर (प्रमुख पाहुणे)

३९) ८ वे कोकण मराठी साहित्य संमेलन-पणजी-गोवा (३१ जाने. ते २ फेब्रु. २००३)

४०) ४ थे कोकण मराठी साहित्य संमेलन - सावंतवाडी

४१) 'समर्थन' वार्षिकोत्सव

४२) पुणे फेस्टिवल (२४ ऑगस्ट ते १ सप्टें. २००१)

४३) 'श्री अक्षरधन' - बोरीवली / सहावे कविसंमेलन (मे २००५)

४४) 'चतुरंग प्रतिष्ठान' / सायंकाळी एक रांगोळी (११ मे १९९४)

४५) सार्वजनिक गणेशोत्सव ब्राह्मण आळी / शतक महोत्सव - २००५

४६) 'संस्कृती' - नाशिक आयोजित 'सहस्त्रकाची ग्रंथयात्रा' (२४ डिसें. १९९९ ते २ जाने. २०००)

४७) 'हिरोशिमाच्या कविता' प्रकाशन / मॅजेस्टिक प्रकाशन (५ ऑगस्ट २०००)

४८) कर्नाटक राज्य महाराष्ट्र साहित्य परिषदेचे ३ रे संमेलन - उस्मनाबाद (३ व ४ जून १९९५)

४९) नवचैतन्य प्रकाशन - रौप्य महोत्सवी वर्ष (२००५)

सूची संकलन

**डॉ. प्रदीप कर्णिक**
ग्रंथपाल, रुपारेल महाविद्यालय,
मुंबई.

**डॉ. महेश केळुसकर**
भास्कर अपार्टमेंट,
४०३/अ, जांगीड इस्टेट,
मिरारोड (पू.) ४०११०७

**संपादकीय**

**मुखपृष्ठावरून**

या दृष्टीनेच आमच्या तंत्रनिकेतनातर्फे जिओ इन्फर्मेटिक्सच्या संदर्भात परिषद आयोजित केली आहे. गेली काही वर्षे औषधशास्त्रांच्या संदर्भातही माहिती तंत्रज्ञानाचे उपयोजन वाढत्या प्रमाणात आहे. त्याला वैदकीय ज्ञान क्षेत्रांचीही जोड आहे. त्यातूनच जिओइन्फर्मेटिक्स प्रमाणे बायोइन्फर्मेटिक्स हे नवीन अभ्यास क्षेत्र उदयास आले आहे.

या 'इन्फर्मेटिक्स' मध्ये विविध प्रणाली, पद्धतींचा विकास अद्याप चालू आहे. संगणक व इंटरनेट या माध्यमांवर आधारित अशी तंत्रे व त्यांचे ज्ञान वरीलप्रमाणे इतर विषयांतही वापरण्यास सुरुवात झाली आहे. 'माहितीशास्त्र' ही संकल्पना त्यामुळे महत्त्वाची ठरली आहे. या शास्त्रांचे स्वरूप अत्यंत विशाल आहे, अधिक होणार आहे.

विद्याप्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाने या संदर्भात काळानुरूप असा विषय परिषदेसाठी निवडला.

# स्थापत्य विशारद - भारतरत्न सर विश्वेश्वरैय्या


## डॉ. सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या जन्मदिन

१५ सप्टेंबर २००६ रोजी अभियंता दिन साजरा केला जातो. या दिवशी डॉ. सर मोक्षगुंडम यांचा जन्मदिन असतो.

या निमित्ताने विश्वेश्वरैय्या यांचा थोडक्यात परिचय

विश्वेश्वरैय्या १५ सप्टेंबर १८६० कोलार जिल्ह्यात जन्मले. बंगलोर मध्ये त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण झाले. त्यांनी रस्ते, रेल्वे, जलसिंचन यासंबंधी महत्त्वाचे काम केले. त्यांनी काही ग्रंथालयेही स्थापन केली. तसेच शैक्षणिक संस्था उदा. प्रिंटींग, व्होकेशनल इन्स्टिट्यूट, कारखाने, बँका यांतही त्यांनी सुधारणा केल्या. विश्वेश्वरैय्या हे असिस्टंट इंजिनिअर म्हणून १८८४ मध्ये मुंबई सरकारी सेवेत होते. १९०९ मध्ये मुख्य अभियंता म्हणून त्यांनी म्हैसूर राज्यात काम केले. तसेच ते रेल्वेत सेक्रेटरी म्हणूनही कार्यरत होते.

औद्योगिक समितीमध्ये आणि शैक्षणिक क्षेत्रातही ते अध्यक्ष होते. १९१२ मध्ये ते म्हैसूर राज्यात दिवाण होते. भद्रावती आयर्न वर्क्स मध्ये ते चेअरमन होते. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स बंगलोर येथे ते गव्हर्निंग कौन्सिलमध्ये सभासद होते.



डॉ. सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या

टाटा आयर्न आणि स्टील या कारखान्यातही ते गव्हर्निंग कौन्सिलचे सभासद होते. लंडन मधील बॅंकचे समिती मध्ये ही त्यांचे सभासदत्व होते.

सर विश्वेश्वरैय्या हे १९०८ मध्ये निवृत्त झाले. विश्वेश्वरैय्या यांचा प्रामाणिकपणा, कामातील हुषारी, कोणतेही काम करण्याची तत्परता यांची जाणीव ठेऊन म्हैसूरच्या महाराजांनी त्यांची म्हैसूरच्या विकासासाठी मुख्य अभियंता म्हणून नेमणूक केली.

त्यांनी काही महत्त्वाची कामे केली. ती खालीलप्रमाणे आहेत.

- कृष्णराजसागर धरण - बृंदावन गार्डन हे भारतातील सर्वात मोठे धरण होय. म्हैसूर चंदन तेल व चंदन साबण या कारखानदारितही त्यांनी सुधारणा केल्या. म्हैसूर युनिव्हर्सिटी त्यांनी स्थापन केली.
- स्टेट बँक ऑफ म्हैसूर सुरू करण्यातही त्यांचे सहकार्य होते.
- मुलींना शिक्षणासाठी त्यांना उद्युक्त केले. सार्वजनिक ग्रंथालये (म्हैसूर आणि बंगलोरमध्ये) त्यांनी सुरु केले.

## त्यांना मिळालेली मानांकने अशी.

१९०४ - ऑनररी मेंबरशिप ऑफ लंडन इन्स्टिट्यूट ऑफ सिव्हील इंजिनिअर

१९०६ - कैसर - इ - हिंद

१९११ - C.I.E. (कंपॅनिअन ऑफ दी इंडियन एम्पायर) दिल्ली दरबार.

१९१५ - K.C.I.E (Knight commander of the order of the Indian empire)

१९२१ - D.Sc - कलकत्ता युनिव्हर्सिटी

१९३१ - LLD - मुंबई युनिव्हर्सिटी

१९३७ - D.Lit - बनारस हिंदु युनिव्हर्सिटी

१९४३ - माननीय लाइफ मेंबर इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स.

१९४४ - D.Sc - अलाहाबाद युनिव्हर्सिटी

१९४८ - डॉक्टरेट LLD म्हैसूर युनिव्हर्सिटी

१९५३ - D.Lit - आंध्र युनिव्हर्सिटी

१९५३ - ऑनररी फेलोशिप ऑफ दी इन्स्टिट्यूट ऑफ टाऊन प्लॅनर

१९५५ - भारतरत्न

१९५८ - दुर्गा प्रसाद खैतान मेमोरिअल सुवर्णपदक - रॉयल एशियाटिक सोसायटी कौन्सिल ऑफ बेंगाल

१९५९ - फेलोशिप ऑफ दी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स बंगलोर

विश्वेश्वरय्या निरलसपणे कोणतेही काम करायचे ते व्यवस्थित आणि मन:पूर्वक. यामुळे सर्वांच्या मनात आदराचे स्थान त्यांनी निर्माण केले.

त्यांचा कार्यशैलीमुळे १५ सप्टेंबर हा त्यांचा जन्मदिन 'अभियंता दिन' म्हणून साजरा होतो.

**सौ. भारती जोशी**

## विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर

विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर ही माझी प्रार्थना नाही.
विपत्तीमध्ये मी भयभीत होऊ नये एवढीच माझी इच्छा.
दुःखतापानं व्यथित झालेल्या माझ्या मनाचे
तू सांत्वन करावंस अशी माझी अपेक्षा नाही,
दुःखावर जय मिळवता यावा एवढीच माझी इच्छा.
माझ्या मदतीला कोणी आलं नाही
तर माझं बळ मोडून पडू नये एवढीच माझी इच्छा.
जगात माझं नुकसान झालं,
केवळ फसवणूकच वाट्याला आली,
तर माझं मन खंबीर रहावं एवढीच माझी इच्छा.
माझं तारण तू करावंस, मला तारावंस ही माझी प्रार्थना नाही.
तरून जाण्याचं सामर्थ्य माझ्यात असावं एवढीच माझी इच्छा.
माझं ओझं हलकं करून
तू माझं सांत्वन केलं नाहीस तरी माझी तक्रार नाही
ते ओझं वाहायची शक्ती मात्र माझ्यात असावी एवढीच माझी इच्छा.
सुखाच्या दिवसात नतमस्तक होऊन
मी तुझा चेहरा ओळखावा दुःखाच्या रात्री
सारं जग जेव्हा माझी फसवणूक करील
तेव्हा तुझ्याविषयी माझ्या मनात
शंका निर्माण होऊ नये
एवढीच माझी इच्छा

**- गुरुदेव रवींद्रनाथ ठाकूर**

# थ्री चिअर्स फॉर 'MY' मराठी!

*भाषा बोलताना आपण किती धेडगुजरी बोलत असतो त्याचा हा अनुभव. अनुभवाची मांडणी विनोदाच्या अंगाने जाणारी असली तरी मुद्दा महत्त्वाचा आहे. - संपादक*

'अनो, कमॉन गेट अप सून... इटस् सेव्हन थर्टी बाबा. इति सौभाग्यवती. २७ फेब्रुवारी 'मराठी दिन' आणि या दिवसाची सुरुवातच या वाक्याने झाली. हे वाक्य ऐकून 'माझी मराठीचिये बोलु कवतिके। अमृतातेही पैजा जिंके॥' असे म्हणणाऱ्या ज्ञानेश्वरांनीही मनातल्या मनात कपाळाला हात लावला असेल. वास्तविक पाहता चिरंजीवाला मराठी माध्यमातच घालावं, असा माझा आग्रह होता पण 'सौ' चा इंग्रजी माध्यमांतच घालण्याचा हट्ट! 'अगं, आम्ही मराठी माध्यमातून शिकलो; पण आमचं कुठं अडतंय का?' हे वाक्य किमान हजार वेळा तरी मी 'सौ' ला सुनावलं असेल, पण तिचं उत्तर कायम, 'तो काळ वेगळा होता!' जणू काही, ती मला बाबा आदमच्या काळातलाच मानत होती की काय देव जाणे!

चिरंजीव इंग्रजी माध्यमाच्या...चुकलं! इंग्लिश मीडियमच्या शाळेत जाऊ लागले. पण घरात मात्र सारा संवाद मराठीतच. तेव्हा मी 'सौ' ला म्हटलं, 'आता टटूला (आमचे चिरंजीव) इंग्रजी शाळेत घातलंस ना? मग किमान थोडं थोडं तरी इंग्रजीतून संभाषण करीत जा! बाच, नेमक्या बाच माझ्या म्हणण्याचा ती माझ्यावर सूड उगवत असावी. हा सूड नाही तर काय? माझ्यासारख्या मराठीवर प्रेम करणाऱ्याच्या घरात मराठी दिनाला मंगलप्रभाती असं धडधडीत इंग्रजी वाक्य! पण त्यातल्या त्यात वाक्यातला शेवटचा शब्द 'बाबा' हा तरी अस्सल मराठी होता म्हणून मी राग आवरला. म्हणतात ना, शेवट गोड ते सारंच गोड. शिवाय टटूबरोबर 'ही' सुद्धा आदरार्थी 'बाबा' म्हणायला लागली होती, बाचं समाधान होतंच.

इतक्यात 'सौ' चं वाक्य कानावर आदळलं - 'शॉवरचा टॅप पाहा ना, चलताही नही।' या वाक्यानं मात्र मी तीनताड उडालो. सहा शब्दांच्या वाक्यातले 'पाहा ना' हे दोन शब्द वगळता बाकीचे चार शब्द अमराठी! नाही म्हणायला 'शॉवर' या शब्दाला 'चा' प्रत्यय मराठी होता, हीच काय ती समाधानाची बाब. तरी पण काय झालं? आमची 'सौ' पार्ले पूर्वसारख्या अस्सल मराठमोळ्या वस्तीतली! शिवाय पार्ल्यातल्या नामांकित शाळेची माजी विद्यार्थिनी! झालंच तर कनिष्ठ महाविद्यालयात असताना मराठी वाङ्मय मंडळातही होती. 'म्हणे!' 'पुष्पगुच्छ बनवण्याचं काम माझ्याकडेच असायचं', असं तिनेच मला अनेकदा अभिमानानं सांगितलंय, मराठीची एवढी पार्श्वभूमी असताना साधं सहा शब्दांचं शुद्ध वाक्य तिला येऊ नये, हे माझंच दुर्दैव.

मी माझ्याच 'सौ' शी वाद घालण्याच्या भानगडीत न पडता, माझं पटापट आवरलं आणि कार्यालयाकडे निघालो. बसमध्येही फारशी गर्दी नव्हती. त्यामुळे बसायला आरामशीर जागा मिळाली. तरीसुद्धा 'सौ' चे सकाळचे शब्द मनात घोळतच होते. माझ्या पाठीमागील बाकावरच कंडक्टर आणि त्याचा दुसरा कंडक्टर मित्र गप्पा मारत बसले होते. त्यातला एक म्हणाला, 'काल रात्री नाईट होती ना! म्हणून जाऊ शकलो नाही राव!'

या वाक्यानं माझं डोकं गरगरू लागलं. 'काल रात्री नाईट होती' हे काय वाक्य झालं! रात्री 'नाईट' असणार नाही तर काय रात्री 'डे' असणार! त्याला म्हणायचं होत की, 'काल रात्रपाळी होती.' पण पाळी म्हणण्याची पाळी आली की ही मंडळी त्याला 'नाईट शिफ्ट' असं 'हायफाय' नाव बहाल करतात. जणू काही हे बससेवेत नसून विमानसेवेतच आहेत! 'रात्री नाईट झाल्यावर सकाळी मॉर्निंग वॉकला जायला जमलं नसेलच ना!' असं त्याला विचारायचा मला मोह झाला होता; पण तो मी आवरला. 'आम्हा घरी धन! शब्दांचीच रत्ने' या चालीवर बरीच मंडळी

आपल्या शब्दरत्नांची उधळमास करत असतात.

ही बाब शिफ्टपुरतीच मर्यादीत नाही हं! बरीच मोठमोठी मंडळी तावातावने सांगतात, 'अगोदर मला रायटिंगमध्ये लिहून दे.' असं वाक्य ऐकल्यावर हसावं की रडावं हेच कळत नाही. हा द्विरुक्तीचा प्रकार मराठी व इंग्रजी शब्द आले तरच होतो, असं नाही बरं का! इंग्रजी वाक्यांतही माणसं द्विरुक्ती करतात. 'मिस्टर देशपांडे, व्हाय डोण्ट यू नॉट कम विथ मी?' असेही काही जण सर्रास विचारतात. जर का हा देशपांडे इंग्रजीचा व्यासंगी असेल, तर, तुझ्याबरोबर म्हणशील तेथे येतो, पण तुझं इंग्रजी आवर' असं नक्कीच म्हणेल'.

इतक्यात ड्रायव्हरने करकचून ब्रेक्स दाबले आणि माझं विचारचक्र थांबले. सुदैवाने लगेच माझा स्टॉप आला. मी धावतपळत कार्यालयात पोहोचलो. सकाळच्या वेळी इतरांशी बोलण्याची फारशी वेळ आली नाही. दुपारी जेवण झाल्यावर मी सहज सहकारी पतपेढीत चक्कर मारली, तेथे मानेंनी माझी एकाशी ओळख करुन दिली, 'हे खानविलकर, आपले ऋणकारी आहेत.' एवढ्यात आणखी एक गृहस्थ तेथे आले. मानेंनी त्यांचीही ओळख करुन दिली, 'हे कामत, हे सुद्धा ऋणकारी आहेत.' पुढे मानेंनी अशीही पुस्ती जोडली की, 'खानविलकर कामतांचे ऋणकारी आहेत आणि कामत खानविलकरांचे ऋणकारी आहेत.' मानेंचं वाक्य ऐकून माझं डोकं पुन्हा एकदा गरगरू लागले. कामत आणि खानविलकर तिथून गेल्यावर मी मानेंना विचारलं, 'ते दोघेही एकमेकांचे ऋणकारी कसे?'

माने हसत म्हणाले, 'अहो, खानविलकर डेटर आहेत आणि कामत क्रेडिटर. डेटर आणि क्रेडिटर या दोन्ही शब्दांसाठी मराठीत एकच शब्द आहे - ऋणकारी.' माझा मराठी बाणा पार गळून गेला. तरीसुद्धा अवसान आणून मी म्हणालो, 'असं कसं शक्य आहे?'

'विश्वास नसेल तर शब्दकोश पाहा', माने हसतच उत्तरले. मी धावतच माझ्या टेबलापाशी आलो. माझ्याजवळचे दोन-तीन मराठी-इंग्रजी शब्दकोश चाळले. मानेंचं म्हणणं खरं होतं. 'ऋणकारी' शब्दाचा पहिला अर्थ होता debtor (ऋणको) आणि दुसरा अर्थ होता creditor (धनको). हे म्हणजे 'हुशार' चा पहिला अर्थ 'बुद्धिमान' आणि दुसरा अर्थ 'मठ्ठ' असं देण्यासारखं होतं. मानेनं माझा सपशेल त्रिफळा उडवला होता.

मी उदासपणे बसून राहिलो. त्यावेळी मला आठवले ते आमचे प्राध्यापक मर्मज्ञ ' त्यांनी मला समजावून सांगितलं होतं. त्यांच्या घरातील त्यांच्यासह सर्वजण, 'न्हाणीघरातल्या फडताळात ती बाटली असेल बघ,' असं वाक्य म्हणू शकतात. नाम मुखी 'आले'-'घेतले नाही' या चालीवर 'न्हाणीघर', 'फडताळ' असे शब्द त्यांच्या तोंडी येतात.' त्यांना ते ओढूनताणून 'आणावे लागत नाहीत.' त्यांची आठवण झाली आणि मन शांत झालं.

एरवी साडेआठ-नऊला घरी पोचणारा मी, आज दोन तास लवकरच घरी पोचलो आणि सुखद धक्का बसला. आमची 'सौ' आणि चिरंजीव टट्टू आतल्या खोलीत बसून 'अक्षरबागे'तील कुसुमाग्रजांच्या कविता म्हणत होते. टट्टूला मराठी शब्द उच्चारताना त्रास पडत होता; पण तो प्रयत्न करत होता. त्यांच्या आनंदाचा भंग करायची माझी इच्छा नव्हती. इतक्यात 'सौ' मध्ये बाहेर आली आणि मला पाहून म्हणाली, 'अय्या, तुम्ही कधी आलात? बसा हं, चहा ठेवते.' तिच्या तोंडून 'अय्या' शब्द ऐकून मी धन्य झालो. टट्टू 'शुभंकरोती' म्हणू लागला. त्याचे निरागस शब्द ऐकताना मला भरून आलं. एवढ्यात 'सौ' ने चहाचा कप हातात दिला. मी आनंदाने मनातल्या मनात ओरडलोच, 'थ्री चिअर्स फॉर 'माय' मराठी! आणि पटकन जीभ चावली. मग हळूच पुटपुटलो, 'मराठीचा विजय असो! मराठी चिरायू होवो!

श्री. अनिरुद्ध पागे
वांद्रा, पूर्व
मुंबई ४०० ०५१

# बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे
# लिनक्स ठाणे २००६

विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाने ओपनसोर्स सॉफ्टवेअर चळवळ ठाणे परिसरांत सुरु करण्यासाठी लिनक्स ठाणे २००६ या परिषदेचे आयोजन दिनांक २४-२५ नोव्हेंबर २००६ रोजी केले होते. याआधी माहिती तंत्रज्ञान विभागाने विद्यार्थ्यांसाठी, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी, शिक्षकांसाठी तसेच मुंबई विद्यापीठाच्या संगणक शिक्षकांसाठी कार्यशाळा भरवल्या होत्या. आता या विभागाने या परिषदेद्वारे ठाणे परिसरांतील लोकांपर्यंत ओपनसोर्स सॉफ्टवेअरची माहिती पोहचवली.

या परिषदेला रेड हॅट प्रा. लिमिटेडचे श्री. शंकर अय्यर, सीडॅकच्या श्रीमती अलका इराणी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर उपस्थित होते.

श्री. शंकर अय्यर यांनी संगणकीय दीपप्रज्वलन करून परिषदेची सुरुवात केली. ते त्यांच्या भाषणात म्हणाले की आज जगभरात २ ते ३ लक्ष लोक ओपन सोर्स सॉफ्टवेअरचा वापर करत आहेत. भारतात जवळपास ५० टक्के कॉर्पोरेट कंपन्यांमध्ये देखील ओपन सोर्स सॉफ्टवेअर वापरले जाते. भारतात सर्वप्रथम ओपन सोर्स सॉफ्टवेअर वापरण्याची सुरुवात बी.ए.आर.सी व टी.आय.एफ.आर. यांनी केली. श्रीमती अलका इराणी आपल्या भाषणात म्हणाल्या की, ओपन सोर्स सॉफ्टवेअरच्या रूपात आपल्याला एक वरदान लाभलेले आहे. ओपन सोर्स सॉफ्टवेअरमुळे संगणक क्षेत्रात प्रगती करण्यासाठी पैशाचा मोठा अडथळा दूर झाला आहे.

सीडॅकच्या श्री. गिरीश मनी, श्री. अनाल वारसी, श्री. संतोष आणि श्री. सोधी यांनी काही तांत्रिक सत्रे घेतली. तसेच त्यांनी इंडिक्स सिस्टिमबद्दल चर्चा केली. पुणे विद्यापीठाच्या श्री. रामू त्यागराजन या एम.सी.ए. ला शिकत असलेल्या विद्यार्थ्यांने ओपन सोर्स सॉफ्टवेअरमध्ये ग्राफिक्स कसे वापरतात याचे सादरीकरण केले.

श्री. हिरेन दांड, संयोजक, मुलुंड कॉलेज ऑफ कॉमर्स, श्री. सागर पाटील, रूपारेल कॉलेज, श्री. संतोष कुमार, के.सी. कॉलेज यांनी प्रायवेट व्हर्च्युअल मशीन अँड मेसेज प्रोसेसिंग याबाबतच्या यांत्रिक बाबींविषयी चर्चा केली.

परिषदेच्या दुसऱ्या दिवशी श्री. गोखले यांनी पहिल्या सत्राची सुरुवात केली. त्यांनी एम्बेडेड लिनक्स या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रा. वर्मा यांनी ओपन सोर्स सॉफ्टवेअर व भांडवली सॉफ्टवेअर यांच्या किमतीबद्दल तुलनात्मक चर्चा केली.

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या माहिती तंत्रज्ञान विभागातील द्वितीय वर्षात शिकत असणाऱ्या कु. प्रियांका कदम व कु. यशदा नाईक यांनी 'ओपन सोर्स सॉफ्टवेअर फॉर लायब्ररी : एक अभ्यास' यावर पेपर सादर केला. त्यांनी लायब्ररीमध्ये ओपन सोर्स सॉफ्टवेअर कसे वापरता येईल हे सांगितले.

परिषदेचे सचिव प्रा. अभिजित काळे यांनी विज्ञान महाविद्यालयात व परिसरातील इतर महाविद्यालयात आता लिनक्स/ओपन सोर्स सॉफ्टवेअर वापरायला सुरुवात केली आहे व या सिस्टीममुळे परिसरातील महाविद्यालयांना खूप उपयोग झाला हे सांगितले.

पृष्ठ क्र. २७ वर

# सुरत शहरातला पूर - थरकाप उडवणारे पाच दिवस

*श्री. पुनम सिंगवी यांच्या सहकार्याने प्राप्त झालेल्या लेखाचा अनुवाद येथे देत आहोत. पुराच्या थरकाप उडवणाऱ्या अनुभवांचे हे चित्र आहे.- संपादक*

मैत्रीदिन साजरा करून ६ ऑगस्टच्या सकाळी सुरत जागे झाले ते तापी नदीतील पाण्याची पातळी वाढत असल्याची धसकावून टाकणारी बातमी ऐकतच. अगदी थोड्या काळात पाण्याने नदीचे काठ ओलांडून शहराच्या रस्त्यांत प्रवेश केला. तीराकाठच्या वसाहतीत तर प्रचंड पाणी घरांमध्ये शिरले. पाणी पसरत चालले होते. धास्तावून गेलेल्या सुरतकरांनी आपली संपत्ती, लॉकर्स मधील ठेव, गोडाऊनस् मधील माल वाचविण्यासाठी धावपळ सुरु झाली. शक्य असेल ते सुरक्षित स्थळी हलवायचा प्रयत्न सुरू झाला. तीराकाठच्या गरिबांच्या वसाहतीतील निराधार बांधवांनी आधार मिळण्यासाठी धडपड सुरु केली. अशा वेळी रिकामा वेळ असलेले काही जण असहायपणे काठवर व काठलगतच्या पाण्याची पातळी वाढताना पाहात होते.

काही तासाच्या आतच शहरातली घरे झपाट्याने पाण्याखाली गेली. शहराचा वीजपुरवठा खंडित केला गेला. दूरध्वनी बंद पडले. शहराच्या काही भागांत पाण्याची पातळी सहा फूट तर काही भागांत १० ते १२ फुटांपर्यंत वाढली. काही भागांमध्ये मात्र २-३ फूटच पाणी होते. मोबाईल शिवाय संपर्काचे कोणतेही साधन नव्हते, पण दोन दिवसात चार्ज केले न गेल्याने मोबाईलस् देखील बंद पडले. सर्व जगापासून आपण दूर तुटून पडलो आहोत असे आम्हाला वाटायला लागले. चोहोबाजूंना पाणीच पाणी होते, पण पिण्यासाठी मात्र थेंबही नव्हता अशी विचित्र स्थिती होती. लोक पाण्यासाठी तरसत होते. सगळीकडे भयाण शांतता होती. कुत्र्यांचा आवाज शांततेचा भंग करीत होता.

दोन दिवस अशा कठीण अवस्थेत गेले दोन दिवसांनी परिस्थिती जाणून घेऊन लोकांना मदत करण्याच्या उद्देशाने आकाशात भिरभिरणारी हेलिकॉप्टर्स दिसायला लागली. प्रसुत होणाऱ्या स्त्रिया, तातडीने सेवेची गरज असणारे रुग्ण यांना हेलिकॉप्टर्स मधून इस्पितळात हलवण्यात आले सुरक्षारक्षक कार्यकर्त्यांचे गट दिवसरात्र हे काम करत होते. पाण्यांतून अनेक मृतदेह व जखमींना काढण्याची त्यांची धडपड चाललेली होती. गरीब व गरजूंना अन्नाच्या पिशव्या पुरवल्या जात होत्या.

या अडचणींत भर म्हणजे रँडर पथावरील दोन इमारती कोसळल्या. घटना प्रसंगीच अनेकांना प्राणास मुकावे लागले तर कित्येक जखमी झाले अन्न पुरवण्याचे काम थांबवून हेलिकॉप्टर्स मधील कार्यकर्ते या घटनेत अडकलेल्या अपघातग्रस्तांना बाहेर काढण्यासाठी धावले. पाण्याचा कहर चालूच होता. या पुरात केवळ मनुष्यहानीच नाही तर कित्येक जनावरेही प्राणास मुकली. कुत्री, डुकरे यांची मृत शरीरे पाण्यावर तरंगताना दिसत होती तरंगणारी ही मृत शरीरे पाण्यावर तरंगताना दिसत होती. तरंगणारी ही मृत शरीरे, पाण्यात सळसळणारे साप हे दृश्य भयानक होते. पाण्याचा जोर इतका होता की या जोरामुळे घरांतील फ्रीज सारख्या जड वस्तूही घराबाहेर वाहत गेल्या. अनेक उपयुक्त वस्तू पाण्यावर तरंगत होत्या. ही भयाण अवस्था सलग पाच दिवस होती, नंतर हळू हळू पाणी ओसरायला सुरुवात झाली.

पाणी ओसरणे ही समस्यांची अखेर नव्हती. पाणी ओसरले पण सर्वत्र घाणीचे, चिखलाचे साम्राज्य व मृत जनावरे ठेवून पाण्याखाली गेलेली घरे चिखलाने भरली होती. नागरिक अक्षरश: रडत आपल्या घरांबाहेर बसलेले आढळत होते. चिखलाने माखलेल्या घरांची अवस्था बघवत नव्हती. पुरामुळे प्रचंड वित्तहानी व जीवितहानी

झालेली होती. अनेकांचे लाखो करोडो रुपयांचे नुकसान झाले होते. सुरत हे शहर उद्योगांचे क्षेत्र म्हणून ज्या कापड व हिऱ्यांच्या उद्योगांमुळे ओळखले जाई त्या उद्योगांची ही अपरिमित हानी झालेली होती. यंत्र अवजारे, उत्पादने पाण्यात गेली. रिलायन्स, केआरआय्, बीएच इ. कंपन्यांचाही विध्वंस झाला. लहानमोठ्या सर्व उद्योगांची वाताहत झाली. अनेकांचे संपत्ती घरासह सर्वस्व वाहून गेले. अनेकांची वाहने हरवली. शहराची अवस्था एखाद्या नरकांहून भयाण झाली. दुःखाची छाया, उध्वस्तावस्था सर्वत्र भारून राहिली. सगळे जीवनच जीवहीन बनले.

कालांतराने इतर ठिकाणांहून ट्रक्स व टेम्पो यायला लागले. अन्न, दूध, पाणी व अशा जीवनावश्यक गोष्टींचा हळू हळू पुरवठा सुरू झाला. तहानेने आसन्नमरण व्हावे अशा स्थितीतल्या लोकांनी पाण्याच्या टँकर्सना घेरले. मने प्लेग व तत्सम रोगांच्या फैलावाने धास्तावलेली होती. अनेकांनी तर साफसफाई होईस्तोवर, वीजपुरवठा होईस्तोवर शक्य असेल तेथे स्थलांतर केले होते. महापालिका व अन्य सामाजिक संघटना सफाईचे काम युद्धपातळीवर करत होत्या पण इतकी घाण व चिखल होता की या कामाला आठवड्याहून अधिक कालावधी लागला. इस्पितळांमधील वॉर्डस् जगण्यासाठी धडपड असणाऱ्या रुग्णांनी व्यापले गेले. अशा स्थितीतही अनेक ठिकाणी चोऱ्या, लूट होत असल्याच्या बातम्या येत होत्या. दुःख, दहशत आणि मानसिक विपन्नावस्थेत सर्व नागरिक हताश झालेले दिसत होते. या भयानक पुराने डोकेच चालेनासे झाले.

हा पूर ही नैसर्गिक आपत्ती होती की त्याला माणूसच जबाबदार होता हा अजूनही वादविषय आहे. त्यासाठी एका समितीचे गठन ही करण्यात आले आहे. पण सुरत शहरातील लोकांनी जे भोगले ते मात्र महाभयानक होते पाच दिवस थैमान घालणाऱ्या पुराने सुरतची पाच वर्षे पाठीहट करुन टाकली!

**अमिषा शहा, सुरत**

अनुवाद श्री. मोहन पाठक, ठाणे

## बा.ना बांदोडकर विज्ञान महाविद्यालय ठाणे लिनक्स ठाणे २००६

पृष्ठ क्र. २५ वरून

श्री. सुधन्वा जोगळेकर (लिनक्स जीएनयू पुणे ग्रुपचे अध्यक्ष) यांनी पुण्यामध्ये लिनक्स सिस्टीम कशी कार्यरत आहे याबाबत मार्गदर्शन केले तसेच त्यांनी विद्यार्थ्यांबरोबर लिनक्स सिस्टीमच्या वापराबद्दल चर्चादेखील केली. त्यानंतर फ्री सॉफ्टवेअर असोसिएशनचे अध्यक्ष श्री. नागार्जुन यांनी आपल्याला फ्री सॉफ्टवेअर का व कसे आवश्यक आहे व त्याची उपयुक्तता कशी आहे हे पटवून दिले. आपण फ्री सॉफ्टवेअर हे फक्त तांत्रिकदृष्ट्या योग्य आहे म्हणून न वापरता ते आपल्या समाजाच्या उपयोगी आहेत म्हणून वापरावे असे त्यांनी नमूद केले.

परिषदेच्या समारोप प्रसंगी सीडॅकचे कार्यकारी संचालक श्री. आकिब झिया उपस्थित होते. त्यांनी आपण भांडवली सॉफ्टवेअरच्या विरूद्ध नसून ओपन सोर्स सॉफ्टवेअर भारतासारख्या देशात कसे गरजेचे आहे हे अतिशय सोप्या शब्दात मांडले.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. श्रीमती माधुरी पेजावर यांनी समारोपपर भाषण केले. तसेच त्यांनी पुढील वर्षी ०६ ऑक्टोबर २००७ रोजी रसायनशास्त्र विभागातर्फे घेण्यात येणाऱ्या ''कंटॅमिनंट्स इन फूड बिव्हरेजेस'' परिषदेची घोषणा केली.

या परिषदेचे सचिव प्रा. अभिजित काळे म्हणाले की अशा प्रकारची परिषद ठाणे परिसरात भरली असली तरी यापुढे अशा प्रकारच्या परिषदा माहिती तंत्रज्ञान विभाग, बा.ना.बांदोडकर विज्ञान महाविद्यालय दरवर्षी आयोजित करेल. त्यांनी आभार प्रदर्शन करून परिषदेची सांगता केली.

# परिसर वार्ता

## तंत्रनिकेतन

विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाच्या ग्रंथालयात दि. १९ सप्टेंबर २००६ रोजी ग्रंथालयातीलच पुस्तकांचे प्रदर्शन होते.

प्रदर्शनाचे उद्‌घाटन निवृत्त विद्यापीठ ग्रंथपाल डॉ. एस. आर. गणपुले यांनी केले. यावेळी प्राचार्य श्री. दि. कृ. नायक व विभागप्रमुख उपस्थित होते.



**व्ही. पी. एम्. पॉलिटेक्निकच्या ग्रंथालयातील बुक एक्झीबिशनचे उद्‌घाटन करताना डॉ. एस्. आर्. गणपुले**

प्रदर्शनात विविध विषयांवरील पाठ्यपुस्तके, संदर्भ ग्रंथ, शब्दकोश, विश्वकोश, मराठी पुस्तके होती. या प्रदर्शनास परिसरातील ग्रंथपाल व विद्यार्थीही उपस्थित होते.

श्री. डॅनी केळकर Eng. Marina Amsnam, मॅनेजर प्रोजेक्ट CTC मरिन प्रॉडक्टस् यांनीही पुस्तकांच्या प्रदर्शनास भेट दिली.

पुस्तकप्रदर्शनातील स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी थोडक्यात पुस्तकांची माहिती दिली. या पुस्तक प्रदर्शनामागचा हेतू स्टाफ व विद्यार्थी यांना आपल्या ग्रंथालयातील पुस्तके माहीत व्हावीत व ती हाताळता यावीत हा होता. पाठ्यपुस्तके व संदर्भ ग्रंथही आपल्याकडे उपलब्ध आहेत, याचीही माहिती या प्रदर्शनामुळे झाली. विद्यार्थ्यांच्या उपस्थितीमुळे हे पुस्तक प्रदर्शन उत्तमरित्या यशस्वी झाले.

दि. ५ सप्टेंबर २००६ शिक्षक दिन विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनात ह्यूमन रिसॉर्स सेंटर यांच्यातर्फे साजरा करण्यात आला.

यावेळी तंत्रनिकेतनाचा अहवाल प्राचार्य श्री. दि. कृ. नायक यांनी सादर केला. यानंतर तंत्रनिकेतनातील पुढील कार्यक्रमांची माहिती दिली. ज्या प्राध्यापकांचा निकाल १००% टक्के निकाल लागला आहे त्या प्राध्यापकांचा सत्कार करण्यात आला. याशिवाय ज्या कर्मचाऱ्यांची २० वर्षाहून अधिक सेवा या तंत्रनिकेतनात पूर्ण झाली आहे त्यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.

## अभियंता दिन

रोटरी क्लब ठाणे आणि विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन ठाणे यांच्या समन्वयाने १६ सप्टेंबर २००६ रोजी अभियंता दिन साजरा झाला. यावेळी श्री. जयंत कुलकर्णी, रोटोरियन श्री. अजय दुबे, डॉ. शेखर सुराडकर प्राचार्य श्री. दि. कृ. नायक आणि प्रा. राजेंद्र दास उपस्थित होते.

प्रा. राजेंद्र दास यांनी या समारंभाच्या प्रसंगी स्थापत्य विशारद भारत रत्न - डॉ. सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांची थोडक्यात माहिती त्यांची कारकीर्द व त्यांनी निर्माण केलेली धरणे यांचा आढावा घेतलाच या शिवाय काही प्रसंगांतून त्यांनी त्यांचे व्यक्तिमत्त्व साकार होईल असे प्रसंग विशद केले.




**श्री. जयंत कुलकर्णी, रोटेरियन श्री. अजय दुर्वे, डॉ. शेखर सुराडकर, प्राचार्य दि. कृ. नायक, प्रा. राजेंद्र दास**

यावेळी तेथे उपस्थित असलेल्या अभियंत्याचाही सत्कार करण्यात आला. विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातील गुणवत्ता यादीत असलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कारही यावेळी रोटरी क्लबतर्फे करण्यात आला.

**सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळा**

• खालील विद्यार्थ्यांनी ३ सप्टेंबर २००६ रोजी आकाशवाणी वर 'असे गुरु असे शिष्य' ही संगितिका सादर केली.

कु. शिवानी फडके    कु. सानिका मोरे

कु. मिहिर मुसळे    कु. वरद जोशी

• रोटरी क्लब आयोजित सूरतारा - शास्त्रीय संगीत स्पर्धेत कु. मधुरा जोशी हिला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

• संस्कृती कलादर्पण आयोजित गायन स्पर्धेत मिळालेले यश खालीलप्रमाणे

गट १ - कु. मधुरा जोशी - प्रथम

कु. रोहन कुंटे - उत्तेजनार्थ

कु. तन्मयी धमाले - उत्तेजनार्थ

गट २ - कु. भाग्यश्री फडके - प्रथम

गट ३ - कु. रुचिता वसंत - प्रथम

कु. आकाश कांबळे - उत्तेजनार्थ

कु. सुरभि गोखले - उत्तेजनार्थ

• रोटरॅक्ट क्लब आयोजित 'सूर २००६' गायन स्पर्धेतील बक्षिसपात्र विद्यार्थी खालीलप्रमाणे -

गट अ - कु. मधुरा जोशी - प्रथम

गट ब - कु. तन्मय सिन्नरकर - प्रथम

कु. सुरभि गोखले - द्वितीय

• संस्कृती विविधा ह्यांच्या तर्फे घेण्यात आलेल्या वैयक्तिक गायन स्पर्धेत कु. तन्मय सिन्नरकर ह्याला उत्तेजनार्थ पारितोपिक मिळाले.

• रोटरी क्लब ऑफ ठाणे नॉर्थने आयोजित केलेल्या विविध गुण दर्शन स्पर्धेत आपल्या शाळेच्या सांघिक नृत्याला प्रथम पारितोपिक मिळाले. सहभागी विद्यार्थिनी

कु. करीश्मा चव्हाण    कु. श्रुति शहा

कु. ऋचा गणपुले    कु. दिशा बुधलानी

कु. सुरभि कुलकर्णी    कु. वैभवी चौधरी

७) **जिज्ञासा ट्रस्ट आयोजित आंतरशालेय विज्ञान प्रश्नमंजुषा** - ओजस गोहाड आणि अमला भागवत यांनी जिज्ञासा ट्रस्ट आयोजित जिल्हा स्तरीय विज्ञान प्रश्नमंजुषा जिंकली असून राज्यस्तरीय प्रश्नमंजुषेसाठी त्या १६ डिसेंबर २००६ ला अकोला येथे रवाना होणार आहेत.

८) **राष्ट्रीय बालविज्ञान परिषदेकडून प्रकल्पाची निवड** - अकोल्याला होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी खालील प्रकल्पाची निवड झाली आहे.

**Study of Insects on the trees in our surroundings** - सहभागी विद्यार्थी - प्रियल नागर (गट प्रमुख), अद्वैत रणदिवे, सिमरन भांगले, रिया दाते आणि प्राची जयस्वाल.

१) **संस्कृती कलादर्पण** - विविध गुणदर्शन स्पर्धांमधे खालील मुलांना पारितोषिके मिळाली.

| क्र. | स्पर्धेचे नाव | इयत्ता | विद्यार्थ्यांची नावे | निकाल |
|---|---|---|---|---|
| १. | निबंध स्पर्धा | ५वी/६वी | शारंग भिडे | प्र. क्र |
| २. | चित्रकला | ५वी/६वी | चिंतल बोरीचा | द्वि. क्र. |
| | स्पर्धा | ७वी/८वी | तेजल प्रधान | प्र. क्र |
| ३. | हस्ताक्षर स्पर्धा | ५वी/६वी | तन्वी माधवी | प्र. क्र. |
| | | ७वी/८वी | धवल साखला | प्र. क्र. |
| ४. | भेटकार्ड स्पर्धा | ५वी/६वी | हेतवी मोटा | प्र. क्र. |
| | | ७वी/८वी | दिशा सत्रा | प्र. क्र |

कु. अपूर्वा गायकवाड ९ वी 'ब' शिकणाऱ्या आमच्या विद्यार्थिणीने कळवा येथे झालेल्या जिल्हास्तरीय गाला जलतरण ५० मि. पोहण्याच्या स्पर्धेत विविध प्रकारात प्रथम क्रमांक मिळवुन सुवर्ण पदक व चॅम्पियन ट्रॉफी ची मानकरी ठरली-

१. फ्री स्टाईल
२. बॅक स्ट्रोक
३. ब्रेस्ट स्ट्रोक
४. बटरफ्लाय स्ट्रोक

लायन्स क्लब ऑफ ठाणे (कोपरी) तर्फे घेण्यात आलेल्या स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांना बक्षिसे मिळाली :-

| | | |
|---|---|---|
| कु. रितिका डोंगरे | इ. ७ वी | दुसरे |
| कु. श्रुती पाटील | इ. ८ वी | तिसरे |
| कु. आवृत्ती माहीमकर | इ. ७ वी | चौथे |
| कु. मिहीर पोतनीस | इ. ७ वी | |

उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्रक

- **राष्ट्रीय बालविज्ञान परिषदेकडून प्रकल्पाची निवड-**

जिल्हास्तरावर निवड झालेल्या आमच्या ४ प्रकल्पांपैकी खालील २ प्रकल्पांची विभागीय स्तरासाठी निवड झाली आहे.

i) Study of Insects on the trees in our surroundings : सहभागी विद्यार्थी - प्रिवल नागर (गट प्रमुख), अद्वैत रणदिवे, सिमरन भांगले, रिया दाते आणि प्राची जयस्वाल.

ii) Relation between number of trees, number of people and number of vehicles : तन्मयी चिपळूणकर (गट प्रमुख), ऋचा ठकार, आदित्य नांदुर्डीकर, नीरज कोलगे, सौरभ अवरे.

**जिल्हा परिषद आयोजित आंतरशालेय क्रीडा स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांना पारितोषिक मिळाली.**

१) अपूर्वा गायकवाड - जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धा विजेती - ४०० मिटर फ्री स्टाईल आणि ब्रेस्ट स्ट्रोक.

२) बुद्धिबळ स्पर्धा - सोहम कर्णिक - विभागीय स्तरावर प्रथम पारितोषिक.

३) कॅरम स्पर्धा - मिहिर वाकडे - तालुका स्तरावर विजेता.

४) टेबल टेनिस स्पर्धा - १४ वर्षाखालील मुली - राज्यस्तरावर उपविजेत्या वृषाली प्रसादे, ऋचा आमेडकर, सानिका ओक, सायली साने.

५) बॅडमिंटन स्पर्धा - १७ वर्षाखालील मुली - जिल्हास्तरावर प्रथम पारितोषिक आणि विभागीय स्तरासाठी निवड - ऋचा गणपुले व शर्वरी गांगल.

६) लॉन टेनिस स्पर्धा - आदित्य रानडे - जिल्हास्तरावर विजेता आणि विभागीय स्तरासाठी निवड.

७) कराटे स्पर्धा - जिल्हास्तर

चिराग मालवदकर - सुवर्ण पदक
ऋचा टिपणीस - सुवर्ण पदक

चिन्मय पोटे - रजत पदक
हर्षल पोतनीस - रजत पदक

वरील विद्यार्थ्यांची विभागीय स्तरासाठी निवड झाली आहे.

८) बॅडमिंटन स्पर्धा - जिल्हास्तर १४ वर्षांखालील मुले उपविजेते - रोमित टकले, अनिकेत करंदीकर, अशिश पाध्ये, निनाद ताकभाते.

## राष्ट्रीय प्रज्ञा शोध शिष्यवृत्ती परीक्षा २००५-२००६

कु. तेजस सावंतला २००५-२००६ ची राष्ट्रीय प्रज्ञा शोध शिष्यवृत्ती मिळाली.

## राष्ट्रीय बालविज्ञान परिषदेकडून प्रकल्पाची निवड

२४ सप्टेंबर २००६ ला तालुका स्तरावरील बालविज्ञान परिषद झाली आणि खालील गटांची जिल्हा स्तरासाठी निवड झाली.

i) Stydy of Insects on the trees in our surroundings : सहभागी विद्यार्थी - प्रियल नागर (गट प्रमुख), अद्वैत रणदिवे, सिमरन भांगले, रिया दाते आणि प्राची जयस्वाल.

ii) Relation between number of trees, number of people and number of vehicles : सहभागी विद्यार्थी - तन्मयी चिपळूणकर (गट प्रमुख), ऋचा ठकार, आदित्य नांदुर्डीकर, नीरज कोलगे, सौरभ अम्बरे.

ii) Human body as ecosystem : सहभागी विद्यार्थी - अमला भागवत (गट प्रमुख), मिताली शेट्टी, निहारीका मुंगळे, अदिती कुलकर्णी, अपूर्वा देशपांडे.

iv) Nitrofertilizers : सहभागी विद्यार्थी - हर्षल गाडे (गट प्रमुख), गौरीश नाडकर्णी, वृत्तिका शहा, सौरभी कुलकर्णी, मनीष काळे.

- **गणित संबोध २००६ परीक्षेचा निकाल**

| इ. | एकूण श्रेणी | विशेष श्रेणी | प्रथम श्रेणी | द्वितीय | उत्तीर्ण |
|---|---|---|---|---|---|
| ५ वी | २९ | १ | १९ | ४ | २ |
| ८ वी | २० | ० | १४ | ४ | २ |

सर्वाधिक गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांची नावे

| इयत्ता | नाव | गुण | श्रेणी |
|---|---|---|---|
| इ. ५ वी | कु. तेजस गोखले | ९२ | विशेष श्रेणी |
| इ. ८ वी | कु. आदित्य रानडे | ८८ | विशेष श्रेणी |

- **संस्कृत भित्तिपत्रिका स्पर्धा**

इ. ८ वी ९वी तील खालील विद्यार्थ्यांना बेडेकर महाविद्यालय आयोजित 'संस्कृतास्त्वांना वैशिष्टानि' ह्या विषयावरील भित्तिपत्रिका स्पर्धेत विशेष पारितोषिक मिळाले.

| इयत्ता | नाव | इयत्ता | नाव |
|---|---|---|---|
| ९वी | कु. सुरभि गोखले | ९वी | कु. आदित्य दामले |
| ९वी | कु. रुचा कारखानीस | ९वी | कु. निमिषा शहा |
| ८वी | कु. श्रीकर कांबळे | | |

## के. ग. जोशी कला आणि ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय



प्रा. दिपक पोपट साबळे

के. ग. जोशी कला आणि ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालयातील नेव्हल युनिट (Naval Unit) एन.सी.सी. (NCC) चे प्रमुख प्रा. दिपक पोपट साबळे यांनी दक्षिणी नेव्हल कमांड, कोची

(Southern Naval Command) केरळा येथे नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रीय स्तरावरील प्री कमिशन (Pre-Commission Training) प्रशिक्षणात बेस्ट ऑल राउंड ट्रॉफी Best All Round Trophy पटकावली.

या प्रशिक्षण कालावधीत एन.सी.सी. आणि नेव्ही संबंधीत विविध २२ विषयांवर परीक्षा घेण्यात आल्या, त्यात प्रा. दिपक पोपट साबळे यांनी ८१.११% मिळवून घवघवीत यश संपादन केले. या परीक्षांचे वैशिष्ट्य असे की, या मध्ये उत्तीर्ण होण्यासाठी किमान ५०% ते ७५% गुण मिळणे आवश्यक असते. कारण नेव्ही मध्ये राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीकोनामुळे काही अतिमहत्त्वाचे अभ्यासक्रम असतात ज्यांच्या मध्ये किमान ७५% आणि त्यापुढे गुण मिळणे आवश्यक असते. अशा कठिण प्रशिक्षणात प्रा. दिपक पोपट साबळे यांचे यश उल्लेखनिय आहे.

या विविध परीक्षांमधील पॉवर ऑफ कमांड (Power Of Command - POC) या परिक्षेत त्यांनी १०० पैकी ९१ गुण मिळवून प्रथम क्रमांक प्राप्त केला. यामध्ये प्रामुख्याने ऑर्डर देण्याची योग्यता, कसब, आवाजाची तीव्रता आणि संचलन (Drill) यांना महत्त्व असते.

विविध राज्यातून हजर असलेल्या स्पर्धकांमधून प्रा. दिपक पोपट साबळे यांची संचलन प्रमुख (Parade Commander) म्हणून निवड झाली. एकूण त्यांच्या प्रशिक्षण दरम्यानच्या कालावधीत उल्लेखनीय कामगिरी बद्दल Best All Round Trophy पटकावून महाराष्ट्राच्या शिपेचात मानाचा तूरा रोवला, याबद्दल महाविद्यालयाच्या प्र. प्राचार्या डॉ. (सौ.) शकुंतला सिंह यांनी त्यांचे पुष्प गुच्छ देऊन अभिनंदन केले.

हे प्रशिक्षण भारत सरकारच्या रक्षा मंत्रालयाद्वारे घेण्यात आले.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

- **ठाणे गौरव पुरस्कार**



**डॉ. श्रीमती माधुरी पेजावर, प्राचार्या**

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे यांना त्यांच्या 'आपले पर्यावरण' या क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल ठाणे महानगरपालिकेने २००६ सालच्या "ठाणे गौरव" या पुरस्काराने सन्मानित केले आहे.

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, प्राथमिक विभाग

नाव - **कु. अंकिता हणमंत दुधे**

इयत्ता - ४थी ३

स्पर्धा - १७ वी वर्ल्ड फूनाकोशी शोतोकॉन कराटे चॅम्पियनशिप.

ॲकॅडमी - युनायटेड बुडोकॉन कराटे ॲकाडमी, ठाणे

दिनांक - १७ सप्टेंबर २००६

बक्षिस - कांस्य पदक (ब्रॉंझ मेडल)

स्थान - प्रियदर्शिनी स्पोर्टस कॉम्प्लेक्स (महाकवी कालिदास सभागृह), मुलुंड.

आयोजक - वर्ल्ड फुनाकोशी शोतोकॉन कराटे ऑर्गनायझेशन.




कु. अंकिता हणमंत दुधे

नाव - कु. अंकिता हणमंत दुधे

इयत्ता - ४ थी ३

स्पर्धा - ४ थी कराटे (कुमिथे) चॅम्पियनशिप २००६.

ॲकॅडमी - युनायटेड बुडोकॉन कराटे ॲकॅडमी, ठाणे

दिनांक - १८ नोव्हेंबर २००६

बक्षिस - रजत पदक (सिल्व्हर मेडल)

स्थान - सेलांगोर दरुल एहसान, मलेशिया

आयोजक - सुबा कराटे ॲकॅडमी, मलेशिया

## पूर्व प्राथमिक विभाग

### 'वाहन परिचय' प्रकल्प

हल्लीच्या धावपळीच्या जगात एका जागेवरून दुसऱ्या जागी जाण्यासाठी प्रवास करणे गरजेचं आहे. आजच्या ह्या यंत्रयुगात माणसाचं जीवन फारच गतिमान झालं आहे आणि गतिमान आयुष्यात वाहनांची फारच मोलाची मदत आहे. त्यासाठी पथमार्ग, लोहमार्ग, जलमार्ग आणि हवाईमार्ग या चार वाहतुकीच्या प्रकारांचा वापर केला जातो.

ही सर्व विज्ञान प्रगती मुलांना सोप्या शब्दांत परिचित करुन देण्याचा प्रयत्न 'वाहनांची ओळख' या प्रकल्पातून केला गेला.

पथमार्गात चाकाच्या शोधापासून सर्व दाखवण्यात आले आहे. दोन चाकी, तीन चाकी आणि चार चाकापर्यंत सर्व वाहनांचा परिचय प्रत्यक्ष मॉडेलमधून करुन दिला गेला.

लोहमार्गात रेल्वेस्टेशन व तेथील सर्व देखावा, बोगदा आणि रुळावरून जाणारी गाडी असे सर्व दाखवले. जलमार्गात प्रत्यक्ष बंदर केले आहे. दीपस्तंभही दाखवण्यात आला. लाकडाच्या ओंडक्यापासून याचा शोध लागला त्यामुळे ओंडके, तराफा, चालत असलेली बोट, गेट वे ऑफ इंडिया असा सर्व देखावा दाखविण्यात आला.

हवाईमार्गात धावपट्टी तसेच विमानतळ असे सर्व बारीक सारीक तपशीलासह सर्व दाखविले गेले.

शक्यतो जमेल तेवढे प्रात्यक्षिक स्वरुपात मांडण्याचा सर्वांनी मनापासून प्रयत्न केला.

२००१ सालापासून विविध प्रकल्प दरवर्षी राबवला जातो. यात पूर्व प्राथमिक विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालकवर्ग यांचा मोलाचा सहभाग असतो आणि यासाठी मुख्याध्यापिका सौ. विदुला वैद्य यांचे खूप मोलाचे मार्गदर्शन असते. तेव्हाच असे निरनिराळे उपक्रम व्यवस्थितपणे पार पडू शकतात.

(वाहन प्रगतीने आपला जीवन प्रवास कसा सुखकर झाला ह्याची माहिती आपल्या विद्यार्थ्यांना कळावी यासाठी बेडेकर विद्यामंदिरच्या पूर्व प्राथमिक विभागाने 'वाहन परिचय' प्रकल्प शाळेच्या विद्यालंकार सभागृहात दि. ६, ७ व ८ ऑक्टो., २००६ रोजी सादर केला होता.)

## विधी महाविद्यालय

१. विधि महाविद्यालयाच्या सौ. राजश्री गांधी या मुंबई विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या द्वितीय वर्ष विधि परीक्षेत विद्यापीठात द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या. त्यांना ८०० पैकी ५६० गुण म्हणजेच ७०% गुण मिळाले. २१ सप्टेंबर रोजी जल्लोष २००६ या कार्यक्रमात सौ. राजश्री गांधी यांचा गौरव करण्यात आला.



**राजश्री गांधी यांचा सत्कार करताना प्राचार्या श्रीविद्या**



**श्री. प्रणव फडके आणि कु. मुशर्रफ बुखारी**

२. के.सी. विधी महाविद्यालयातर्फे आंतर महाविद्यालयीन 'पक्षकाराचे समुपदेशन' या स्पर्धेत आमच्या महाविद्यालयाचे श्री. प्रणव फडके व कु. मुशर्रफ बुखारी यांनी द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. दोघांचाही जल्लोष २००६ या २१ सप्टेंबरच्या कार्यक्रमात सत्कार करण्यात आला.

### वार्षिक अहवाल

(विद्या प्रसारक मंडळाच्या वर्धापनदिनी, म्हणजेच १/८/२००६ रोजी विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या यांनी सादर केलेला २००५-०६ या शैक्षणिक वर्षाचा अहवाल-)

मुंबई विद्यापीठाशी संलग्न व बारकौन्सिल ऑफ इंडिया मान्यताप्राप्त अशा आमच्या महाविद्यालयाने ३५ व्या शैक्षणिक वर्षात प्रवेश केला आहे. हे वस्तुनिष्ठ व तटस्थ मूल्यमापन (पुढील प्रगतीसाठी) आम्हाला उपयुक्त ठरेल असा विश्वास आहे.

७ जुलै २००५ रोजी वर्ग अध्ययनास सुरुवात झाली. ९२९ विद्यार्थी संख्येत पुरुष महिला प्रमाण २:१ असे होते. महाविद्यालयाच्या प्रयत्नांना यश येऊन यापैकी २१५ विद्यार्थी शासकीय शिष्यवृत्तीस पात्र ठरले.

### स्पर्धा

या वर्षात विविध शैक्षणिक व शिक्षणेतर स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. तर्क वनविणे, अभिरुप न्यायालय, वक्तृत्व, वादविवाद, निबंध व काव्य लेखन, रांगोळी अशा विविध स्पर्धांत विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

महाविद्यालयाने प्रथमच आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे आयोजन केले. २५ फेब्रुवारी २००६ रोजी, विद्यार्थ्यांना नेहमी नवीन व चांगल्या संधी उपलब्ध करुन देण्यावर भर असणारे व त्यातून त्यांच्या क्षमतांचा

विकास साधतो यावर श्रद्धा असणारे, आमचे प्रेरणास्थान कै. डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या स्मरणार्थ स्पर्धेचे आयोजन केले गेले. आता दर वर्षी २० फेब्रुवारी या डॉक्टरसाहेबांच्या जयंती निमित्ताने "डॉ. वा.ना. बेडेकर स्मृती वादविवाद स्पर्धा" आयोजित केली जाईल व आकर्षक पारितोषिके दिली जातील. या वर्षी विद्यमान व माजी न्यायाधीशांनी स्पर्धेचे परीक्षण केले. आमच्या महाविद्यालयाच्या डॉली मजिठिया व सौ. नैना पुथरन् यांचा संघ द्वितीय पारितोषिकाचा मानकरी ठरला.

## शैक्षणिक आघाडीवर

२००५च्या तृतीय वर्ष विधी परीक्षेचे निकाल महाविद्यालयाच्या परंपरेस साजेसेच लागले. मुंबई विद्यापीठाच्या सरासरी निकालापेक्षा आमचा निकाल अधिक होता. अलिकडेच २००६ चा निकालही समाधानकारक आहे. कु. आरती नागझरकर विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत तिसऱ्या क्रमांकाने आली. तिला कुलगुरु डॉ. विलास खोले यांच्या हस्ते समारंभपूर्वक पारितोषिक प्रदान करण्यात आले.

कु. सविता जाधव (तृतीय वर्ष, विधी) भारतीय सैन्यदलाच्या गुणवत्ता यादीत झळकली. सेवा आयोगाच्या अत्यंत कमी अशी स्त्री अधिकाऱ्यांपैकी ती असणार आहे. द्वितीय वर्ष विधी या वर्गातील श्री. विजय दिवाण यांना समाजसेवेसाठी समाजभूषण पुरस्कार मिळाला.

## आमचे अध्यापक

महाविद्यालयात प्रभारी प्राचार्यांसह दोन पूर्ण वेळ तर १७ अर्धवेळ प्राध्यापक आहेत. प्राध्यापक व विद्यार्थी प्रमाण १:८५ असे आहे.

शिक्षक दिनानिमित्ताने ६ सप्टेंबर रोजी शिक्षकांची विशेष सभा घेण्यात आली. यात शिक्षकांनी अनुभवाधारित असे पुढील मुद्यांबाबत विचार मंथन केले.

अध्यापनपद्धती

वर्गनियमन

विद्यार्थीप्रेरणा

अध्यापनाचे उपयोजन व वर्गाध्यापनाची तयारी

अशा प्रकारची सभा प्रथमच घेण्यात आली.

मुंबई विद्यापीठाच्या विधी शाखेतील अभ्यास मंडळ सदस्य व आमचे प्राध्यापक डॉ. पी. डॅनियन यांनी अलीकडेच 'कर अधिनियमांचा अन्वयार्थ' (Interpretation of Taxing Statutes) या पुस्तकाचे संपादन केले.

ठाण्यातील पर्यावरण शाळेने आयोजित केलेल्या शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळेत आमच्या पूर्णवेळ प्राध्यापिका सौ. प्रज्ञा राजेबहादर यांनी मार्गदर्शन केले. आमच्या अनेक प्राध्यापकांनी विविध प्रशिक्षण कार्यक्रम व परिषदांतून उपस्थित राहून अनेक विषयांतील ज्ञानमंथनात सक्रिय सहभाग घेतला. श्री. एम्. डी. जोशी व कु. हेतल यांनी बौद्धिक संपदा हक्क या विषयावरील ऑन लाइन अभ्यासक्रम पूर्ण केला. श्री. शिवलकर व श्री. ससूपा हे दोन प्राध्यापक निवृत्त झाले.

महाविद्यालयाने प्रथमच सामायिक चाचणी आयोजित केली होती. विद्यापीठाच्या वतीने घेतली गेलेली ही परीक्षा ४५% कमी गुण (मागासवर्गीयांसाठी ४०% कमी गुण) असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी होती.

महाविद्यालयातील प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी सुधारणा अभ्यासक्रम घेण्यात आल्या. एकूण १५ तासांचा हा अभ्यासक्रम पूर्णवेळ प्राध्यापकांनी संयोजित केला.

महाराष्ट्र प्रदुषण मंडळाने टॉऊन हॉल मध्ये आयोजित केलेल्या सुनवणीस उपस्थित राहण्याची संधी विद्यार्थ्यांनी १७ फेब्रुवारीस अनुभवली पर्यावरण व वन मंत्रालयाच्या

या कार्यक्रमात न्यायालयीन कामकाज समजून घेताना पर्यावरण कायदे' हा विषय शिकवणारे प्राध्यापक विद्यार्थ्यांच्या समवेत होते.

२७ जाने. २००६ रोजी घटनादिन साजरा करण्यात आला. यावेळी घटना विषयक कायद्यात संशोधन करण्याचा ठराव करण्यात आला. भारतीय राज्य घटना या विषयी मार्गदर्शन करण्यासाठी अॅड. श्री. दिलीप शिंदे उपस्थित होते. सादरीकरण व माहितीपूर्ण अशा या व्याख्यानाचा अनुभव उद्बोधक होता. व्याख्यानानंतर १३ विद्यार्थ्यांनी राज्य घटनेसंबंधातील विविध विषयांवर निबंध सादर केले.

(अनुवाद - श्री. मोहन पाठक)

||श्री||

माननीय डॉ. विजय बेडेकर यांस,

स.न.

आपण आवर्जून पाठविलेला 'दिशा' मासिकाचा अंक मिळाला. आभार!

अंकातील सर्वच मजकूर, साहित्याचा विशिष्ट असा एक दर्जा सांभाळणारा आहे. अशा प्रकारचे साहित्य लिहवून घेणे, हे संपादकीय कौशल्य आहे. केवळ वाङमयीन विषयाला वाहिलेले नियतकालिक चालविणे हे खूपच कठीण आहे. यासारख्या इतर नियतकालिकांचे अनुभव फारसे सुखावह नाहीत, हे आपणास ही माहीत असेलच. असे असताना देखील आपण 'दिशा' चालविता, हे विशेषच म्हणावे लागेल. असो, पुनश्च धन्यवाद!

आपला नम्र

सुरेश देशपांडे

## वेद, उपवेद, वेदाङगे संक्षिप्त माहिती

ऋग्वेदाच्या २१ कृष्णयजुर्वेद ८५, शुक्ल यजुर्वेद १६, सामवेद १००० अथर्ववेद यांच्या ९ शाखा आहेत. असे व्याकरण महाभाष्यात सांगितले आहे. आज ऋग्वेदाची फक्त एकच शाकल शाखा संहिता उपलब्ध आहे. कृष्णयजु तैत्तिरीय शाखा - आपस्तंभ व हिरण्यकेशी अशा दोन संहिता उपलब्ध आहेत. शुक यजु - काण्वव माध्यंदिन या दोन शाखेच्या संहिता आहेत. सामवेदाच्या कौथुम व राणायनीय या दोन शाखांच्या संहिता आहेत तसेच अथर्ववेदाच्या पिप्पलाद व शौनक या दोन शाखांचा संहिता आहेत.

ऋग्वेद हा १०२८ सूक्तांचा ग्रंथ आहे. त्याची एकूण १० मंडळात वा आठ अष्टकात विभागणी केलेली आहे. मंडळ २ ते ८ यातील प्रत्येक मंडळ कोणा एका ऋषीने लिहिल्यामुळे त्यांना कुलमंडळे या नावाने संबोधिले जाते. या ऋषींची नावे अशी आहेत - गृत्समद, विश्वामित्र, वामदेव, अत्रि, भरद्वाज, वसिष्ठ व आंगिरस. या कुळ मंडळात यांची व यांच्या कुळातील व्यक्तींचे सूक्ते एकत्र केलेली आहेत. नववे मंडळ सोम विषयक आहे. पहिले चार अध्याय पवमान सूक्तांचा आहे. देवतांची स्तुती केली आहे. अग्नि, इंद्र, वरूण तसेच अश्वी, भग, पूषा इत्यादी देवतांची स्तुती विषयक सुक्ते आहेत. लौकिक, आध्यात्मिक व संस्कार विषयक सूक्तेही ऋग्वेदात आढळतात. सृष्टी उत्पत्तीची सूक्ते संवाद सूक्ते, उषःसूक्ते ही ऋग्वेदात आहेत.

शं. वा. मठ